रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९ । अंक ११५ । पृष्ठे ८ ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)

www.krushival.in

विजयादशमीच्या शुभेच्छा

# कृषीवल

रायगड, गुरुवार, दि. २ ऑक्टोबर २०२५

किंमत ४ ₹

## कफ सीरपने घेतला चिमुकल्यांचा जीव

**छिंदवाडा :** मध्य प्रदेशातल्या छिंदवाडा येथे एक धक्कादायक घटना घडली आहे. किडनी फेल झाल्याने तब्बल सहा मुलांचा मृत्यू झालाय. या घटनेमुळे राज्यात एकच खळबळ उडाली आहे. मृत मुलांच्या बायोप्सी रिपोर्टमधून मृत्यूचा अंदाज बांधला जातोय. या रिपोर्टवरुन या मुलांचा मृत्यू कफ सीरपमुळे झाल्याचं डॉक्टरांचं म्हणणं आहे. सहा मुलांचा मृत्यू झाल्यानंतर तज्ज्ञ डॉक्टर पवन नंदुरकर यांनी संगितलं की, नागपूरवरून मृत मुलांचा किडनी बायोप्सी रिपोर्ट प्राप्त झाला आहे. त्यात नमूद केल्याप्रकरणा कुठल्यातरी विषारी घटकामुळे किडनीला बाधा झाली. मृत मुलांच्या शरीरात कफ सीरप कॉमन आढळलं आहे.




## वेधक

### सलग चार दिवस मेगा ब्लॉक

**नेरळ :** कर्जत रेल्वे स्थानक विस्तार कामासाठी बुधवारपासून (दि.१) ते ४ ऑक्टोबर पर्यंत मेगा ब्लॉक घेण्यात आला आहे. या कालावधीत सकाळी अकरा ते पाच वाजेतपर्यंत नेरळ–कर्जत–खोपोली दरम्यान लोकल गाड्या बंद ठेवण्यात येत आहेत. या मेगा ब्लॉकमुळे कर्जत आणि खोपोली मार्गावरील प्रवाशांचे हाल सुरू आहेत. मध्य रेल्वे वरील कर्जत स्टेशन ते पुणे खोपोलीकडे जाणाऱ्या मार्गावरील यार्ड विस्तारीकरण केले जात आहे. गेली वर्षभर तेथे अभियांत्रिकी काम सुरू आहे.

### मनोज जरांगेंची तब्येत बिघडली

**छत्रपती संभाजीनगर :** मनोज जरांगे पाटील यांची दसऱ्याच्या पूर्वसंध्येलाच तब्येत अचानक बिघडली आहे. त्यांना तातडीने छत्रपती संभाजीनगरमधील एका रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, मनोज जरांगे यांना व्हायरल तापाचा त्रास होत असल्याचे समोर आले आहे. यामुळे मनोज जरांगे हे नारायण गडावरील दसरा मेळाव्याला राहणार की नाही? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

### देशातील ५४ विद्यापीठांवर कारवाई

**मुंबई :** विद्यापीठाच्या संकेतस्थळावर, तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाला अनिवार्य माहिती उपलब्ध न केल्याप्रकरणी देशातील ५४ राज्य खासगी विद्यापीठांवर कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. यामध्ये महाराष्ट्रामधील दोन विद्यापीठांसह देशातील तीन राज्यांमधील अमिटी विद्यापीठांवर कारवाई करण्यात आली आहे. देशातील सर्व राज्य खासगी विद्यापीठांना विद्यापीठ अनुदान आयोग कायदा अंतर्गत अनिवार्य माहिती सादर करण्याचे आदेश दिले हाते.

# चित्रलेखा पाटील शेतकऱ्यांच्या बांधावर | बांधबंदिस्तीसाठी आर्थिक मदत जाहीर

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

सध्या संपूर्ण महाराष्ट्रातील बळीराजावर संकट ओढावले आहे. मुसळधार पावसामुळे शेती पाण्याखाली गेली आहे. मराठवाड्यात तर शेतीचा चिखल झाला आहे. याचा फटका रायगड जिल्ह्यालाही चांगलाच बसला. मुसळधार पावसामुळे हातातोंडाशी आलेला घास हिरावून नेला आहे. परिणामी शेतकरी •➤पान २ वर



• ( छायाचित्र - अमोल नाईक )

"रायगड जिल्ह्यामध्ये काही दिवसांपूर्वी अलिबाग, रोहा आणि मुरुड सह सर्व तालुक्यांमध्ये वादळी वाऱ्यासह झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या भातपीकांचे तसेच बागायतदारांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. संपूर्ण शेती पाण्याखाली गेली आहे, तयार झालेली पिके वादळी वाऱ्यामुळे आडवी पडली आहेत. संपूर्ण शेतीचा भाग जलमय झाला आहे. हातातोंडाशी आलेला घास गेल्याने शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. अधिकाऱ्यांनी त्वरीत पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ भरपाई द्यावी अशी मागणी शेकापच्या वतीने आज करण्यात आली, जर बाधित शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत मिळाली नाही तर तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा सुद्धा यावेळी प्रशासनाला दिला."

– चित्रलेखा नृपाल पाटील, शेकाप महाराष्ट्र राज्य प्रवक्त्या

### आमदारांचे शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष

मी अलिबाग–मुरूड मतदार संघाचा आमदार आहे, अशी बतावणी दळवी अनेक ठिकाणी करून प्रशासन व अन्य यंत्रणेवर दबाव आणण्याचा कायमच प्रयत्न करीत आले आहेत. मात्र त्यांच्याच मतदार संघातील शेतकरी अतिवृष्टीमुळे संकटात सापडला असताना त्याकडे •➤पान २ वर

# मंत्रीपदासाठी गोगावलेंना दळवींची अडकाठी?

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।



गोगावलेंना पालकमंत्रीपदाची स्वप्न दाखविणारे आमदार दळवी यांनीदेखील मंत्री पदाची स्वप्ने बघण्यास सुरुवात केली आहे. दळवींचे बगलबच्चे यांनी एका कार्यक्रमात दळवींना मंत्रीपद द्यावे, अशी मागणी केली आहे. त्यामुळे गोगावलेंना मंत्रीपदासाठी दळवींची अडकाठी येण्याची शक्यता राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे.

रोजगार हमी मंत्री भरत गोगावले यांना पालकमंत्री पद मिळावे, यासाठी आमदार दळवी यांनीच मागणी करीत तटकरे आणि गोगावले यांच्यामध्ये भांडण लावून देण्याचे काम केल्याची चर्चा आहे. वेगवेगळ्या कार्यक्रमात गोगावलेच पालकमंत्री अशा बतावण्या करीत गोगावलेंना पालकमंत्री पदाचे स्वप्न दाखविण्यात आले. दळवींच्या या बातांना गोगावले चांगलेच फसले. ते वारंवार पालकंत्री पदाचे स्वप्न पाहू लागले. वेगवेगळ्या कार्यक्रमात मीच पालकमंत्री होणार असे जाहीर करू लागले. परंतु, गोगावलेंनीच त्यांचे गेल्या चार वर्षात हस करून घेतल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहे. एका बाजूला दळवींनी मागील सहा महिन्यापूर्वी तटकरेंना गुरु मानीत त्यांचे गोडवे गायले आहेत. मुरूडमधील एका कार्यक्रमात सुनील तटकरे यांच्याकडून राजकारणाचे धडे घेतल्याचे दळवी यांनी सांगितले. त्यामुळे दळवींची ही दुटप्पी भूमिका गोगावलेंना कधी कळलीच नाही.

आमदार दळवी यांना मंत्रीपद मिळावे, अशी मागणी दळवींचे बगलबच्चे यांनी एका कार्यक्रमात केली आहे. त्यामुळे गोगावलेंच्या पालकमंत्री पदाला दळवींचीच अडकाठी येण्याची शक्यता वर्तविली जात आहे. गोगावले आणि तटकरे यांच्यात भांडणे लावून दळवी त्यांची पोळी भाजण्याचे काम करण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

### शरद पवार-अजित पवारांची भेट

**मुंबई :** राज्यात एकीकडे शिवसेनेच्या दसरा मेळाव्याची चर्चा सुरू असताना दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही प्रमुख नेते एकमेकांना भेटल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. अजित पवार यांनी मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे जाऊन शरद पवारांची भेट घेतली. माळेगाव साखर कारखान्याची सर्वसाधारण वार्षिक सभेची तारीख आणि वेळ ठरवण्यासाठी ही भेट झाल्याची प्राथमिक माहिती आहे. राष्ट्रवादीमधील फुटीनंतर प्रथमच दोन्ही नेते एकत्र आले असून त्यांच्यात चर्चा झाल्याचे समजते. आगामी निवडणुकांच्या अनुषंगाने राजकीय चर्चा झाल्याची शक्यता नाकारता येत नाहीत.

# जिल्हा परिषद आरक्षणाचा कार्यक्रम जाहीर

### १३ ऑक्टोबरला आरक्षण सोडत

। रायगड । प्रतिनिधी ।

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक डिसेंबर महिन्यात होण्याची चिन्हे आहेत. त्यासंदर्भात निवडणूक आयोगाने तयारीला सुरूवात केली आहे. १ ऑक्टोबर २०२५ रोजी राज्य निवडणूक आयोगाचे सचिव सुरेश काकाणी यांनी जिल्हा परिषद व पंचायत समिती मतदारसंघ आरक्षणाचा कार्यक्रम जाहीर केला. ३० ऑक्टोबर २०२५ रोजी अंतिम आरक्षण शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्याबाबत राज्यातील सर्वच जिल्हाधिकाऱ्यांना •➤पान २ वर

**असा आहे आरक्षणाचा कार्यक्रम**

- **६ ऑक्टोबर २०२५ पर्यंत** – अनुसुचित जाती व अनुसुचित जमातीकरिता जागा निश्चित करण्यासाठी विहित नमुन्यातील प्रस्ताव तयार करून विभागीय आयुक्तांकडे सादर करणे.
- **८ ऑक्टोबर २०२५ पर्यंत** – अनुसुचित जाती व अनुसुचित जमातीकरिता राखीव जागांच्या प्रस्तावास मान्यता देणे.
- **१० ऑक्टोबर २०२५** – आरक्षण सोडतीची सूचना वृत्तपत्रात प्रसिध्द करणे. (नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व महिला, अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील व •➤पान २ वर

# आरसीएफ कॉलनीजवळ अपघात

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

अलिबाग रोहा मार्गावरील कुरुळ कॉलनीनजीक पुलाजवळ कार आणि बसचा अपघात झाला. या अपघातामध्ये कारसह बसचे प्रचंड नुकसान झाले. सुदैवाने जीवीतहानी टळळी.

दरम्यान दोन्ही मार्गावर वाहतूक कोंडी झाली होती. वाहतूक पोलिसांनी दहा मिनीटात वाहतूक सुरळीत करीत रस्ता वाहतुकीसाठी खुला केला.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, अलिबागकडून साळावकडे बस जात होती. सायंकाळी साडेचार वाजण्याच्या सुमारास रेवदंड्याकडून अलिबागकडे एम. एच.४३.बी.ई. ४३६९ या क्रमांकाची बस कुरुळ येथील पुलाजवळून जात होती.



त्याचवेळी कार आणि बसचा अपघात झाला.

या अपघातामध्ये कार आणि बसचे नुकसान झाले. यावेळी दोन्ही मार्गावर वाहतूक कोंडी झाली होती. या घटनेची माहिती अलिबाग पोलिसांसह वाहतूक पोलिसांना मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेतली.

सुरुवातीला अपघात झालेली वाहने बाजूला काढून दोन्ही मार्गावरील वाहतूक सुरळीत केली. अवघ्या दहा मिनिटात दोन्ही मार्ग वाहतुकीसाठी खुला झाला.

### वितरणाचा निर्णय घेण्याची मागणी

। रायगड । प्रतिनिधी ।

महावितरणच्या विविध विभागांमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून मीटर वाचन, बिल प्रिंटिंग व वितरणाची जबाबदारी पार पाडणाऱ्या मीटर रिडिंग एजन्सी असोसिएशन, महाराष्ट्र राज्य यांनी आपल्या अडचणींचा मुद्दा उचलून धरीत राज्य शासन व महावितरणकडे तातडीने निर्णय घेण्याची मागणी केली आहे. स्मार्ट मीटर बसविण्याचे काम मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याने पारंपरिक पद्धतीने मीटर वाचन करणाऱ्या एजन्सींचे काम मोठ्या प्रमाणावर कमी झाले आहे. परिणामी, या एजन्सींना कर्मचारी वर्गाला नियमित वेतन देणे अवघड झाले असून, त्यांच्या •➤पान २ वर

## रस्ता गेला खड्ड्यात



**पावसाळ्यातील रस्त्यांना खड्ड्यांचा साज, डांबर उडून गेलं, साहेबांनाही नाही लाज... खड्ड्यांच्या या गावात, वेगाला नाही वाव, थांबत-धडपत चालणं, प्रवाशांवरच आले नाव... ठेकेदाराला सलाम, असं केलं त्यानं काम, बिनखडीच्या रस्त्यांनी प्रवाशांना फोडला घाम...**

**फुलबाजार सोन्याने सजला | खरेदीसाठी बाजारपेठांमध्ये ग्राहकांची गर्दी**

# दसऱ्याला झेंडू महागला, पावसाने आवक घटली!

। रायगड । प्रतिनिधी ।

साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेल्या दसऱ्याच्या मुहूर्ताच्या निमित्ताने फुल बाजारात नागरिक गर्दी करत आहेत. रायगडातील बाजारपेठ फुलांनी व सोन्याने म्हणजेच आपट्याच्या हिरव्या पानांनी सजली आहे, मात्र काही दिवसांपासून पडणाऱ्या पावसामुळे आवक कमी झाली असून, फुलांच्या किमती वाढल्या आहेत.

बाजारात पिवळा, भगवा, नामधारी, लाल या प्रकारातील झेंडूच्या फुलांची मोठ्या प्रमाणावर खरेदी-विक्री होते. ८० ते १५० रुपये किलो भावाने झेंडूच्या फुलांची विक्री होत आहे. देवीच्या पूजेसाठी वापरली जाणारी शेवंती १०० ते २०० रुपये किलो आहे. यासह अस्टर, मोगरा, जाई, जुई, चाफा, गुलछडी, गुलाब, सोनचाफा, जरभरा या फुलांचा बाजार सुरू आहे. यासह झेंडूच्या फुलांचा एक मीटर हार १०० रुपये, तोरण ५० ते १०० रुपये, पूजेसाठी लागणारे बेल पान, तुळस, दुर्वा १० ते २० रुपये जुडीप्रमाणे विकले जात आहे.



### २०-५० टक्क्यांनी वाढ

पावसामुळे फुलांचे नुकसान झाले असून बाजारात आवक घटली आहे. तर, काही ठिकाणी माल खराब होत आहे. परिणामी, फुलांच्या दरात वीस ते पन्नास टक्क्यांची वाढ झाली असल्याचे फुलविक्रेत्यांनी सांगितले.

**फुलांचे भाव**

| | |
|---|---|
| पिवळा झेंडू | ७० रु. |
| भगवा झेंडू | ७० रु. |
| आपट्याची पाने | १० – २० रु. |
| करडू फुले | १० ते २०रु. |
| आंब्याची पाने | २० – ३० रु. |
| भाताच्या लाह्या | १० – २० रु. |
| गुलाब | २० रु. |
| कमळ | २० नग |
| पिवळा अष्टर | ८० – १०० |
| जांभळी अष्टर | १०० |
| गजरा | २० रु. |
| एक वेणी | ४० रु. |
| एक सुट्टे गुलाब | १०० रु. |
| नामधारी गोंडा | ८० रु. किलो. |



### विद्यार्थी सुरक्षेसाठी डेडलाईन

। मुंबई । प्रतिनिधी ।

शालेय मुलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने शासननिर्णयाच्या माध्यमातून आखण्यात आलेल्या उपाययोजनांची शाळांकडून पूर्तता केली जात आहे की नाही याचा तपशील ९ ऑक्टोबरपर्यंत अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करा, असे आदेश उच्च न्यायालयाने राज्य सरकारला दिले. शाळांकडून या मार्गदर्शक तत्त्वांचे अनुपालन होत आहे की नाही यावर पालकांना देखरेख ठेवता यावी यासाठी न्यायालयाने हे आदेश दिले.

शालेय मुलांच्या सुरक्षेबाबतच्या मार्गदर्शक तत्वांच्या योग्य अंमलबजावणीसाठी पारदर्शकता महत्त्वाची आहे यावरही न्यायमूर्ती रेवती •➤पान २ वर

# एसटीची हंगामी भाडेवाढ रद्द

। मुंबई । प्रतिनिधी

दिवाळीच्या तोंडावर एसटी महामंडळाकडून करण्यात आलेली प्रस्तावित १० टक्के भाडेवाढ रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मंगळवारी या भाडेवाढीची घोषणा करण्यात आली होती, तर त्याच्या दुसऱ्याच दिवशी ती भाडेवाढ रद्द करण्यात आली आहे.

एसटी महामंडळाने दिवाळीच्या तोंडावर, १५ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबर या दरम्यान १० टक्के हंगामी भाडेवाढ करण्याची घोषणा केली होती. दिवाळीच्या काळात मोठ्या प्रमाणात प्रवासी एसटीचा प्रवास करतात. त्यामुळे या काळात महसूल वाढीसाठी महामंडळाने हा निर्णय घेतला होता. परंतु या निर्णयावर सर्व स्तरातून नाराजी व्यक्त करण्यात येत होती. आता ही भाडेवाढ रद्द करण्यात आली आहे.



दिवाळीसाठी करण्यात आलेली एसटीची भाडेवाढ तात्काळ रद्द करण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या होत्या. महाराष्ट्रातील सध्याची पूर परिस्थिती लक्षात घेऊन ही भाडेवाढ रद्द करावी, असे एकनाथ शिंदे यांनी सुचविले होते. त्यावर प्रताप सरनाईक यांनी ही भाडेवाढ रद्द करण्याचे एसटी प्रशासनाला आदेश दिले. दिवाळी सणासाठी एसटी बसने •➤पान २ वर

# श्रीवर्धनचा विकास, समुद्रकिनारे भकास

## • जीवनाबंदर जेट्टीच्या भरावामुळे परिसराला धोका

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

मागील दोन वर्षांपासून श्रीवर्धन येथील जीवनाबंदर जेट्टीच्या विकासाचे काम सुरू आहे. जेट्टीच्या पुनर्निर्माणासाठी या ठिकाणी खूप मोठ्या प्रमाणता दगडांचा भराव करण्यात आलेला आहे. या दगडांच्या भरावाबरोबरच त्यावरती मुरूम व मातीचा भराव देखील करण्यात आलेला आहे. यावर्षी पावसाने जोरदार तडाखा दिल्याने व समुद्र खवळलेला असल्याने या नव्याने निर्माण होत असल्याचे जेट्टीचे दुष्परिणाम श्रीवर्धनच्या नागरिकांना दिसू लागले आहेत.

श्रीवर्धन समुद्रकिनारी गणेश विसर्जनासाठी तसेच नागरिकांना व पर्यटकांना समुद्रामध्ये उतरण्यासाठी धूप प्रतिबंधक बंधाऱ्यावरील रॅम्पचीदेखील दुरवस्था झाली आहे. त्यामुळे एकीकडे श्रीवर्धनचा विकास होतोय तर दुसरीकडे तेथील समुद्रकिनारे भकास होत चालले आहेत, अशी चर्चा स्थानिकांमध्ये रंगू लागली आहे.

श्रीवर्धन समुद्रकिनारी गणेश विसर्जनासाठी तसेच नागरिकांना व पर्यटकांना समुद्रामध्ये उतरण्यासाठी धूप प्रतिबंधक बंधाऱ्यावर रॅम्प बांधण्यात आले. परंतु, या ठिकाणाची वाळू खाली खचल्याने हे रॅम्प अपुरे पडू लागले होते. दरम्यान, धूप प्रतिबंधक बंधाऱ्याचे सुशोभीकरणाचे काम रविराज इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीने हाती घेऊन या रॅम्पची लांबी वाढवून दिली होती. परंतु, रॅम्पची लांबी वाढवून देत असताना त्याच्या खाली दगडांचा भराव केला होता. खरतर खूप खोल खड्डा खणून भराव करून त्यावर काँक्रिट टाकणे आवश्यक होते. परंतु, तसे न करता केवळ भरावावरती स्लॅब टाकल्याने समुद्रालाटांच्या जोरदार तडाख्यामुळे या रॅम्प खालील दगड वाहून गेले असून रॅम्पही तुटून पडले आहेत. ऐन गणेशोत्सवात पाण्याच्या वाढलेल्या पातळीमुळे या रॅम्पच्या दुरुस्तीचे काम पूर्णपणे होऊ शकले नाही. त्यामुळे नागरिकांना गणेश विसर्जन करण्यासाठी खूप मोठा त्रास सहन करावा लागला होता. तसेच, या अगोदर समुद्राचे पाणी धूप प्रतिबंधक बंधारा ओलांडून येत नव्हते. परंतु, यावर्षी समुद्राचे पाणी धूप प्रतिबंधक बंधारा ओलांडून किनाऱ्याकडील भागामध्ये येत असल्याचे पाहायला मिळाले.

या सर्वला जीवनाबंदर जेट्टीतील भराव कारणीभूत असल्याचे बोलले जात आहे. या भरावामुळे श्रीवर्धन येथील अत्यंत जुनी असलेली जेट्टीसह खालचा जीवना परिसर पूर्णपणे वाळूने भरून गेला आहे. त्यात भर म्हणजे या जेट्टीच्या विकासासाठी अजूनही या ठिकाणी दगडांचा खूप मोठा भराव करण्यात येणार आहे. हा भराव करताना श्रीवर्धन येथील धूप प्रतिबंधक बंधाऱ्याची उंची कमीत कमी पाच ते सहा फुटाने वाढविणे आवश्यक आहे. अन्यथा श्रीवर्धनच्या किनारपट्टीच्या भागांमध्ये भरतीच्या व मोठ्या उधाणाच्या वेळी समुद्राचे पाणी परिसरात शिरल्याशिवाय राहणार नाही, अशी शक्यता जाणकारांकडून व्यक्त केली जात आहे.

### बंधाऱ्याची लांबी वाढविण्याची गरज

श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावरील धूप प्रतिबंधक बंधाऱ्याची लांबी अजून वाढवली गेल्यास दांडे परिसराकडे देखील पाण्याचा ओघ मोठ्या प्रमाणावर वाढलेला दिसून येईल. पर्यायाने महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड व नवीन जेट्टीचे काम करणाऱ्या विकासकाने या गोष्टींची जाणीव शासनाला करून द्यावी. वाढीव निधीची तरतूद करून श्रीवर्धन येथील धूप प्रतिबंधक बंधाऱ्याची उंची देखील लवकरात लवकर वाढवावी. तसेच, या ठिकाणी बांधण्यात आलेले व पर्यटकांना समुद्रामध्ये जाण्यासाठी तयार केलेले रॅम्प नव्याने तयार करून या ठिकाणच्या स्थानिक नागरिकांना गणपती विसर्जनासाठी किंवा दुर्गा विसर्जनासाठी कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होणार नाही. याकडे लक्ष देण्याची आवश्यकता असल्याचे स्थानिकांकडून बोलले जात आहे.

# गुंडगे रस्त्यावरील झाड धोकादायक

**। वेनगाव । प्रतिनिधी ।**



कर्जत शहरातील गुंडगे गावाकडे जाणाऱ्या रहदारीच्या रस्त्यावर एक भले मोठे झाड रस्त्यावर झुकलेल्या अवस्थेत आहे. ते कधीही तुटून खाली पडण्याची शक्यता असून ते झाड तोडण्यात यावे, असे येथील ग्राम स्थांचे म्हणणे आहे.

या रस्त्यावरून येथील विश्वनगर, गुंडगे गाव, पंचशील नगरमधील नागरिकांची तसेच गुडशेफर शाळेतील विद्यार्थी व पालकांचा सारखी वर्दळ असते. त्यामुळे नागरिकांना आपला जीव मुठीत घेऊन जावे लागत आहे. मात्र, या गंभीर बाबीकडे नगर परिषद व वनविभागाचे दुर्लक्ष होत असून ते झाड कधीही खाली कोसळून मोठा अपघात होण्याची शक्यता आहे. असे झाल्यास या घटनेला जबाबदार कोण, असा सवाल नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# नुकसानीचे पंचनामे करण्याची मागणी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यात आलेला वादळी वारा आणि पाऊस यामुळे भाताच्या शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. भाताचे पीक जमिनीवर कोसळले असून भाताची शेती धोक्यात आली आहे.

तालुक्यातील ९० टक्के शेतकऱ्यांची भातशेती पाण्याखाली गेली असून सतत होणाऱ्या नुकसानीमुळे शेतकरी शेती व्यवसायापासून दूर जायला लागला आहे. त्यामुळे भाताच्या पिकाच्या नुकसानीचे पंचनामे करण्याची मागणी आरपीआय आठवले पक्षाच्यावतीने करण्यात आली असून याबाबत कर्जत तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले आहे. यावेळी कोकण प्रदेश कार्याध्यक्ष राहुल डाळींबकर, सुनील सोनवणे, मनोज गायकवाड, दिपक भालेराव, किशोर गायकवाड, राजू जगताप, अरविंद मोरे, राहुल गायकवाड, अशोक गायकवाड व दिपक गायकवाड आदी उपस्थित होते.

# कोकबन येथील रस्ता चिखलात

**। रोहा । प्रतिनिधी ।**

शेकडो भाविक आराध्य दैवत श्री धावीर महाराजांच्या दर्शनाला येत असतात. त्यातील जागृत देवस्थान म्हणून ख्याती असलेला चणेरा विभागातील कोकबणच्या श्री धावीर महाराज मंदिराकडे जाणारा रस्ता अक्षरशः चिखलात रुतल्याचे चित्र समोर आले. कोकबण मुख्य रस्त्यापासून केवळ अडीच-तीन किलोमीटर असलेला रस्ता अत्यंत निमुळता व चिखल, खड्ड्यांमुळे धोकादायक झाला आहे. त्यामुळे ऐन नवरात्रोत्सवात श्री धावीर महाराजांच्या दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांना मोठी कसरत करावी लागत असल्याचे भयाण वास्तव समोर आले आहे. दरम्यान, ग्रामस्थांनी हा रस्ता श्रमदानातून कच्चा बनवला होता. तो पाचसहा दिवस सलग झालेल्या मोठ्या पावसात वाहून गेल्याचे ग्रामस्थ भारत पाटील यांनी सांगितले आहे.

# संघर्ष समितीचे मुख्याधिकाऱ्यांना साकडे



**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

रस्त्यावरील उनाड गुरे, भटकी कुत्री अशा अनेकविध समस्या मुरुडकरांची डोकेदुखी ठरत आहेत. त्यावर ठोस उपाययोजना करण्यासाठी मुरुड संघर्ष समितीने नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सचिन बच्छाव यांची पुन्हा भेट घेऊन समस्या सोडवण्याची मागणी केली आहे.

मुरुड मधील विविध प्रकारच्या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी मागील पंधरवड्यात नगरपरिषदेत मुख्याधिकारी यांच्या दालनात बैठक घेण्यात आली होती.

त्यावेळी पंधरा दिवसांत यावर समन्वयक तोडगा काढणार असल्याचे आश्वासित करण्यात आले होते. परंतु, या समस्यांवर अद्याप कोणतीही कार्यवाही न झाल्याने संघर्ष समितीने पुन्हा मंगळवारी (दि.३०) मुख्याधिकारी यांची भेट घेतली. यावेळी शहरातील रस्त्यांवरील उनाड गुरे, भटक्या कुत्र्यांची वाढती समस्या यावर ठोस उपाययोजना करण्यावर भर देण्यात आला. तसेच, भाजी मार्केट व मासळी मार्केट रस्त्यावरील अतिक्रमणे हटविण्याची चर्चा देखील करण्यात आली.

यावेळी मुरुड संघर्ष समितीचे कुणाल सतविडकर, महेश कारभारी, नेहा पाके, जाहिद फकजी, राहुल कासार, विशाल कोलवणकर, दिपक राजपुरकर, प्रदीप बागडे व प्रतिक उमरोटकर आदी उपस्थित होते.

पान १ वरून

## चित्रलेखा पाटील शेतकऱ्यांच्या बांधावर

संकटात सापडला आहे. अशी परिस्थिती असताना आमदार साहेब आणि त्यांचे बगलबच्चे तुला करण्यात मग्न आहेत. तर शेकापच्या नेत्या चित्रलेखा पाटील यांनी शेताच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांची व्यथा समजून घेतली. लवकरात लवकर शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी, अन्यथा शेकाप तीव्र आंदोलन करेल, असा इशाराही दिला. तसेच बांधबंदिस्तीसाठी आर्थिक मदत जाहिर केली.

अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील विशेष करून अलिबाग तालुक्यातील खारेपाट व अन्य भागातील भातपीक पाण्याखाली गेले. शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी बुधवारी (दि.१) खारेपाट परिसरातील नुकसान झालेल्या भात पिकांची पाहणी केली. शहापूर, धेरंड येथील शेतकऱ्यांसोबत संवाद साधत शेकाप तुमच्या पाठीशी आहे, अशी ग्वाही दिली. दरम्यान, कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क साधून तात्काळ पंचनामे करण्याची सुचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. यावेळी शेकाप जिल्हा चिटणीस मंडळाचे सदस्य अनिल पाटील, शेकाप शेतकरी तालुका सभा अध्यक्ष अनिल पाटील, शेकाप तालुका सहचिटणीस नरेश म्हात्रे, राजन पांचाळ, विक्रांत वार्डे आदी शेकाप पदाधिकारी, कार्यकर्ते व शेतकरी उपस्थित होते.

शेतकरी कामगार पक्ष कायमच तळागाळातील घटकाशी बांधिलकी जपणारा पक्ष म्हणून ओळखला जातो.शेतकरी, कष्टकरी कामगारांच्या हितासाठी काम करणारा पक्ष म्हणून शेकापची ख्याती आहे. अतिवृष्टीमुळे भातशेती पाण्याखाली गेल्याने शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. ही बाब शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी अलिबाग तालुक्यातील धेरंड, शहापूर येथील शेताच्या बांधावर जाऊन तेथील नुकसानीची पाहणी केली. शेतकऱ्यांशी संवाद साधत शेकाप शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे, अशी ग्वाही चित्रलेखा पाटील यांनी दिली.

## आमदारांचे शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष

**मात्र त्यांचे दूर्लक्ष असल्याचे समोर आले आहे. तुला कार्यक्रमात आमदार दळवी मग्न आणि शेतकरी वाऱ्यावर असे चित्र दिसून येत आहे. विधानसभेच्या निवडणूकीत निवडून येण्यासाठी राजा केणी यांनी साकडे घातले होते. तो कार्यक्रम करण्यात आमदार व्यस्त आहेत. परंतु शेतकऱ्यांना भरपाई देण्यासाठी कोणत्याही प्रकारची दखल घेण्यास ते अपयशी ठरल्याची चर्चा आहे.**

## वितरणाचा निर्णय घेण्याची मागणी

उपजीविकेवर गदा येत आहे.

असोसिएशनच्या म्हणण्यानुसार, स्मार्ट मीटर बसविणारी कंत्राटी यंत्रणा अनेक ठिकाणी अपूर्ण कामे करून निघून जाते. त्यामुळे काही भागात अंशतः स्मार्ट मीटर बसवले गेले असून, ग्राहक शोधणे व वाचन करणे अत्यंत कठीण ठरत आहे. यामुळे एजन्सींना दुहेरी आर्थिक फटका बसत आहे. याबाबतचे निवेदन अलिबाग येथील महावितरण कार्यालयात नुकतेच सादर करण्यात आले. सध्याच्या परिस्थितीत कामकाज सुरळीत ठेवणे अवघड झाल्याचे असोसिएशनने स्पष्ट केले. खर्चात झालेली वाढ व रिडिंग कामातील घट लक्षात घेता, सध्याचे दर अत्यंत अपुरे व तोट्याचे ठरत असल्याचा असोसिएशनचा दावा आहे. यापूर्वीच दरवाढीचा प्रस्ताव सादर करूनही तो अद्याप निर्णयाविना प्रलंबित असल्याने असंतोष वाढत आहे.

**असोसिएशनने मांडलेल्या मागण्या**

करार संपेपर्यंत संबंधित ग्राहक पूर्ववत ठेवावेत. शंभर टक्के स्मार्ट मीटर बसवून पूर्ण होईपर्यंत त्या क्लस्टरमधील पूर्ववत ग्राहक संख्येप्रमाणेच रक्कम एजन्सींना अदा करावी. दरवाढीचा प्रस्ताव तातडीने मंजूर करावा. जर शासन व महावितरण प्रशासनाने तातडीने निर्णय घेतला नाही, तर राज्यभरातील सर्व मीटर रिडिंग एजन्सी कामबंद आंदोलन छेडतील, असा इशारा असोसिएशनने दिला आहे.या पार्श्वभूमीवर महावितरण प्रशासन कोणता निर्णय घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## विद्यार्थी सुरक्षेसाठी डेडलाईन

मोहिते-डेरे आणि न्यायमूर्ती संदेश पाटील यांच्या खंडपीठाने उपरोक्त आदेश देताना प्रामुख्याने भर दिला. या मार्गदर्शक तत्त्वांच्या अंमलबजावणीचा तपशील अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध केल्यास पालकांना तो पाहणे आणि त्याची शहानिशा करणे शक्य होईल. तसेच, त्यातील त्रुटींच्या तक्रारी शिक्षण विभागाकडे करता येतील, असेही खंडपीठाने स्पष्ट केले.

बदलापूर येथील एका शाळेत बालवाडीत शिकणाऱ्या दोन मुलींचे शाळेच्या शिपायाने लैंगिक शोषण केले होते. या घटनेची पुनरावृत्ती होऊ नये आणि शालेय मुलांची सर्वतोपरी सुरक्षा केली जावी यासाठी दोन निवृत्त न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यीय समितीने केलेल्या शिफारशींच्या आधारे सरकारने मार्गदर्शक तत्त्वांशी संबंधित शासननिर्णय मे महिन्यात काढला होता. तत्पूर्वी, राज्यातील सर्व शाळांकडून मार्गदर्शक तत्त्वांची अनुपालन माहिती गोळा करण्याची प्रक्रिया अद्याप सुरू असली तरी ४० टक्के शाळांनी सरकारच्या अधिकृत संकेतस्थळावर ही माहिती अपलोड केली आहे, अशी माहिती अतिरिक्त सरकारी वकील प्राजक्ता शिंदे यांनी न्यायालयाला दिली.

शिक्षण विभागाने २४ आणि २५ सप्टेंबर रोजी केलेल्या पत्रव्यवहारानंतर शाळांनी ही माहिती अपलोड करण्यास सुरुवात केल्याचेही शिंदे यांनी न्यायालयाला सांगितले. शालेय शिक्षण आणि क्रीडा विभागाने सरकारी, अनुदानित आणि खासगी शाळांना ६० प्रश्नांचा समावेश असलेली प्रश्नावली पाठवली होती. त्यात, १३ मे रोजीचा शासननिर्णय पालकांना व्हाट्स ॲप, ई-मेल किंवा सूचनांद्वारे उपलब्ध करण्यात आला होता का ? सखी-सावित्रीबाई समित्या आणि विद्यार्थी सुरक्षा समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत का ? यासारख्या तपशीलांचा समावेश असल्याचेही सरकारी वकिलांनी न्यायालयाला सांगितले.

**तर शाळांवर दबाव राहील**

तथापि, सरकारी संकेतस्थळ अद्याप जनतेसाठी खुले नसल्याची बाब या प्रकरणी न्यायमित्र म्हणून नियुक्त केलेल्या वकील रेबेका गोन्साल्विस यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली. न्यायालयानेही त्याची दखल घेतली. तसेच, शालेय मुलांच्या सुरक्षेशी संबंधित मार्गदर्शक तत्त्वांच्या अनुपालनाचा तपशील संकेतस्थळावर उपलब्ध केल्यास पालकांना त्यावर देखरेख ठेवण्यास सक्षम केले जाईल, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. तसेच, चाळीस टक्के शाळांनी याबाबतचा तपशील संकेतस्थळावर अपलोड केला असला तरी पालकांना तो उपलब्ध असला पाहिजे, त्यामुळे शाळांवर दबाव राहील, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

## जिल्हा परिषद आरक्षणाचा कार्यक्रम जाहीर

कळवले आहे. विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयातील नोडल ऑफिसर यांनी प्रत्येक टप्प्यावरील कामकाजाबाबत आयोगास अहवाल सादर करावा असेही राज्य निवडणुक आयोगाने कळवले आहे.

### असा आहे आरक्षणाचा कार्यक्रम

सर्वसाधारण महिलांसहबाबत)

१३ ऑक्टोबर २०२५ – जिल्हा परिषद गटासाठी व पंचायत समिती गणासाठी आरक्षण सोडत.

१४ ऑक्टोबर २०२५ – प्रारूप आरक्षणाची अधिसुचना प्रसिध्द करणे.

१४ ते १७ ऑक्टोबर २०२५ – जिल्हाधिकारी यांच्याकडे जिल्हा परिषद व पंचायत समितीमधील प्रारूप आरक्षणावर हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी.

२७ ऑक्टोबरपर्यंत – प्राप्त प्रारूप आरक्षणावरील हरकती व सुचना आधारे अभिप्रायासह गोषवारा विभागीय आयुक्त यांना सादर करणे.

३ नोव्हेंबर २०२५ रोजीपर्यंत – प्रारूप आरक्षणावर प्राप्त हरकती व सुचनांचा विचार करून आरक्षण अंतिम करणे.

३ नोव्हेंबर २०२५ रोजी अंतिम आरक्षण शासन राजपत्रात प्रसिध्द करणे.

## एसटीची हंगामी भाडेवाढ रद्द

प्रवास करणाऱ्यांची संख्या लाखोंच्या घरात आहे. सध्या चारचाकी खासगी वाहने वाढली असली तरीही एसटीचा प्रवास सुरक्षित प्रवास मानला जातो. त्यामुळेच एसटी प्रवासाला प्राधान्य दिले जाते.

या आधी एसटी महामंडळाने १० टक्के भाडे वाढ प्रस्तावित केली होती. वातानुकूलित शिवनेरी आणि शिवाई बसेस सोडता सर्वच बसेससाठी १० टक्के दरवाढ लागू करण्यात येणार होती. त्यामुळे, गावखेड्यापासून ते रातराणीने लांब पल्ल्याच्या गाड्यांनी प्रवास करणाऱ्या सर्वच प्रवाशांना या भाडेवाढीचा फटका बसणार होता. आधीच राज्यातील बळीराजा अतिवृष्टीने खचून गेलेला असताना, आता दिवाळीपूर्वीच सार्वजनिक वाहतूक प्रवासाच्या भाडेवाढीचा फटका सर्वसामान्यांना बसणार होता. परंतु आता हा निर्णय मागे घेण्यात आला आहे.

**महाराष्ट्र शासन, गृह विभाग (बंदरे व परिवहन)**
**महाराष्ट्र सागरी मंडळ**
**सागरी अभियंता व चिफ सर्व्हेअर**
इंडीयन मर्कटाईल चेंबर्स, तिसरा मजला, रामजीभाई कमानी मार्ग, वेलाई पिअर, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.: ०२२-२६२३९९४५, फॅक्स क्र. ०२२-२६२३११२५
Website : https://malammb.maharashtra.gov.in Email : mecs.mumbai@mmb.maharashtra.gov.in

**ई निविदा सूचना (सन २०२५-२६)**
Main Portal : https://mahatenders.gov.in
Department Portal : www.mahammb.maharashtra.gov.in
महाराष्ट्र सागरी मंडळ, मुंबई मार्फत "Maintenance Dredging at Navigation Channel of Mandwa, Dist. Raigad 2025-26" या कामासाठी ई-निविदा मागविण्यात येत आहे.

| Sr.No, | Name of work | Earnest Money Deposit in Rs. | Blank Tender form amount in Rs. |
|---|---|---|---|
| 1. | "Manintenance Dreding at Navigation Channel of Mandwa, Dist Raigad 2025-26" | 3,00,000/- | 3,540/- |

तपशिलवार अटी व शर्ती पाहण्यासाठी तसेच कोरा निविदा फॉर्म डाउनलोड करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या ई-निविदा पोर्टल https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ०२.१०.२०२५ रोजी ११.०० वा. पासुन ते दिनांक १३.१०.२०२५ रोजी ११.०० वा. पर्यत उपलब्ध होतील. कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा कारण न दर्शविता नाकारण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीकार यांचेकडे राखून ठेवण्यात आला आहे.

सही/-
**सागरी अभियंता व चिफ सर्व्हेअर,**
महाराष्ट्र सागरी मंडळ, मुंबई.

**जाहीर नोटीस**

अर्ज क्र. ४६०/२०२५

मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात

श्री. मुहम्मद अस्लम अब्दुल गफुर साखरकर
वय ५७ वर्षे, धंदा शेती, अर्जदार
रा. मु. पो. गोरेगांव,
ता. माणगांव, जि. रायगड

विरुध्द

१. निबंधक जन्म - मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत गोरेगांव,
ता. माणगांव, जि. रायगड. सामनेवाला
२. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्री. मुहम्मद अस्लम अब्दुल गफुर साखरकर यांचा जन्म मौजे गोरेगांव, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. २७/०७/१९६८ रोजी राहत्या घरी झाला. त्यांची जन्माची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दि. ०४/०९/२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचा जन्म मौजे गोरेगांव, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. २७/०७/१९६८ रोजी राहत्या घरी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. मुहम्मद अस्लम अब्दुल गफुर साखरकर यांचा जन्म मौजे गोरेगांव, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. २७/०७/१९६८ रोजी राहत्या घरी झाला. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगांव सही/-
ता. २५/०९/२०२५ कार्यकारी दंडाधिकारी माणगांव

**जाहीर नोटीस**

अर्ज.क्र. ४६१/२०२५

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो. माणगांव यांचे न्यायालयात**

श्री.खलील अहमद हुसैन बहूर
वय : ६१ वर्षे, धंदा शेती,
रा. मु. पो. गोरेगांव, अर्जदार
ता. माणगांव, जि. रायगड

विरुद्ध

१. निबंधक जन्म - मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत गोरेगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.
२. गटविकास अधिकारी सो., सामनेवाला
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्री. खलील अहमद हुसैन बहूर यांचा जन्म मौजे गोरेगांव, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. २१/०९/१९६४ रोजी राहत्या घरी झाला. त्यांची जन्माची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दि. १५/०९/२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचा जन्म मौजे गोरेगांव, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. २१/०९/१९६४ रोजी राहत्या घरी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. खलील अहमद हुसैन बहूर यांचा जन्म मौजे गोरेगांव, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. २१/०९/१९६४ रोजी राहत्या घरी झाला. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगांव सही/-
ता. २५/०९/२०२५ **कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**

**जाहीर नोटीस**

अर्ज क्र.४६२/२०२५

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात**

श्री.अब्दुल रज्जाक अब्दुल गफुर साखरकर
वय : ६४ वर्षे, धंदा : शेती, अर्जदार
रा. गोरेगाव,
ता. माणगांव, जि. रायगड

विरुद्ध

१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत गोरेगाव,
ता. माणगांव, जि. रायगड. सामनेवाला
२. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव,
ता.माणगांव, जि.रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्री. अब्दुल रज्जाक अब्दुल गफुर साखरकर त्यांचा जन्म मौजे गोरेगाव,ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. ०१/०६/१९६१ रोजी राहत्या घरी झाला. त्यांच्या जन्माची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दि. २१/०८/२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचा जन्म मौजे गोरेगाव ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. ०१/०६/१९६१ रोजी राहत्या घरी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. अब्दुल रज्जाक अब्दुल गफूर साखरकर जन्म मौजे गोरेगाव ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. ०१/०६/१९६१ रोजी राहत्या घरी झाला, असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

ठिकाण :- माणगांव सही /-
ता. २५/०९/२०२५ **कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे आशिल यांनी जमिनीचे मालक श्री.अमोल ज्ञानेश्वर चव्हाण रा.रीस, ता. खालापूर, जि. रायगड यांचेकडून खालील वर्णनाच्या जमीन मिळकती कायम स्वरूपी मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविलेले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

मौजे भोकरपाडा, ता. पनवेल, जि. रायगड, ग्रुप ग्रामपंचायत भोकरपाडा, तलाठी सजा भोकरपाडा येथील सर्वे क्र.१५/२अ बिन शेती क्षेत्रफळ १-४०-७० हे.आर. असेसमेंट १४.०७ रू. पै. या मिळकतीपैकी श्री.अमोल चव्हाण यांचे अविभक्त हिश्श्याचें ७/१२ सदरी नमुद क्षेत्र ०-३५-१७५ हे.आर. बिन शेती मिळकतीचे

सदर मिळकतीवर अगर तिच्या कोणत्याही भागावर कोणाचाही, गहाण, दान, बक्षिस, फरोक्तखत, पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्टा वहीवाट साठेकरार, लीज, तबदील, ट्रस्ट वारसा या प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास व तसेच सदर मिळकती संदर्भीत मिळकत बोजा विरहीत असलेबाबत तसेच सदर मिळकती संदर्भीत मालकी हक्काबाबत/स्वामित्वाबाबत खरेदीखताचे हस्तांतरणाबाबत कोणाचीही हरकत असल्यास संबंधितांनी आपापल्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार यांचेकडे अगर खालील नमुद केलेल्या पत्त्यावर सकृतदर्शनी लेखी पुराव्यासहीत रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कुणाचीही कसल्याही प्रकारची हरकत नाही असे समजणेत येईल व आमचे आशिल जमिन मालक यांचेसोबत मिळकत खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील यांची नोंद घ्यावी.

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**ॲड. महेश थोरवे**
कार्यालयाचा पत्ता- पोपटबाग को. ऑप. सो.
३ रा मजला, फ्लॅट नं ३०१, आनंद नगर,
कचेरी रोड कर्जत ता. कर्जत, जि. रायगड
मो. नं ८००७५३७६५६

**PUBLIC NOTICE**

NOTICE is hereby given that I am investigating title of MR. HEMANT CHANDRASHEKHAR MEHTA and MR. VINOD CHANDRASHEKHAR MEHTA, in respect of the Land more particularly described in the Schedule hereunder written, with a view to ascertain that the same is clear, marketable and free from all encumbrances and reasonable doubts.

All persons having or claiming any right, title, claim or interest of any nature whatsoever or howsoever, including by way of kul, sale, exchange, assignment, gift, trust, inheritance, maintenance, mortgage, lease, tenancy, license, lease pendens, custodia legis, easement, attachment or otherwise into, upon or in respect of the said land or part thereof, are required to make the same known in writing to the undersigned with all particulars and documentary evidence thereof to the undersigned at his office at Karjat or by Electronic Mail on Email id: rajendra.nigudkar@gmail.com, within 14 days from the date hereof, which if not registered and/or made known within the said period shall be presumed or deemed to have waived the same.

**SCHEDULE OF LAND**

ALL THAT piece or parcel of Agricultural Land bearing Survey No. 50, Hissa No.11A, admeasuring 0-20-0 (Heeter-Are) equivalent to 20 Gunta, situate, lying and being at Village Bhoirwadi, Taluka-Karjat, in the Registration District of Raigad.

Dated this 02nd day of October 2025

Sd/-
**Adv. Rajendra Pandharinath Nigudkar**
Court View Co-Op.
Housing Society Ltd., Shop No. 1,
Opp. Karjat Civil Court,
Tal. Karjat, Dist. Raigad.
Mob.: 9822774075/8484965626






# खड्ड्यात गेला रस्ता..

**निर्लज्ज प्रशासन, लोकप्रतिनिधींवर नागरिकांचा रोश**

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

अलिबाग-रोहा, अलिबाग-पेण, अलिबाग-मुरूड, अलिबाग- तळेखार, अलिबाग-रेवस मार्गावरील रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. नवरात्रौत्सवानंतर गुरुवारी (दि.२) अनेक मुर्तींसह घटांचे विसर्जन केले जाणार आहे. या खड्ड्यांतूनच मिरवणुका काढण्याचीवेळ भक्तांवर येणार आहे. त्यामुळे निर्लज प्रशासनासह लोकप्रतिनिधींना नागरिकांकडून रोश व्यक्त केला जात आहे. तसेच, रस्त्यासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी आणला असल्याचा दिखावा आमदार दळवी यांनी अनेक वेळा वेगवेगळ्या कार्यक्रमांसह फलकांद्वारे जाहीरातीमार्फत केला आहे. मात्र, आलेला निधी गेला कुठे, असा प्रश्न देखील उपस्थित केला जात आहे.

अलिबाग-रोहा, अलिबाग-रेवदंडा, अलिबाग-साळाव ते तळेखार व अलिबाग-पेण मार्गावर खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. खड्डे चुकविताना अनेकवेळा अपघात झाले आहेत. दुचाकी वाहने घसरून पडण्याच्या घटना वाढू लागल्या आहेत. पर्यटकदेखील या रस्त्यावरून प्रवास करण्यास टाळत आहेत. त्याचा परिणाम अलिबाग मुरूडमधील पर्यटनावर होत आहे. खड्डेमय रस्त्यामुळे पर्यटकांचादेखील ओघ कमी झाला आहे. त्यामुळे स्थानिकांच्या रोजगावर परिणाम होत आहे. अलिबाग-पेण मार्गावरील खंडाळे, तिनविरा, धरमतर पुल ते शहाबाज



येथे ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. राष्ट्रीय महामार्ग असतानादेखील या रस्त्यावरून निश्चित स्थळी पोहण्यास तासनतास विलंब होत आहे. या रस्त्यावरून प्रवास नको रे बाबा, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. विकासाच्या नावाखाली अनेक रस्ते खोदून ठेवण्यात आले आहेत. त्यामध्ये साळाव ते तळेखार रस्त्याची अवस्था बिकट आहे. या मार्गावरील रस्ताच गायब झाला आहे.

अलिबाग-रेवदंडा, अलिबाग-मुरूड हे ठिकाण पर्यटनासाठी महत्वाचे ठरले आहेत. परंतु, येथील खड्डेमय रस्त्यामुळे प्रचंड त्रास चालकांसह पर्यटकांना होत आहे. अनेक वेळा चालकांना अपघाताला सामोरे जाण्याची वेळ आली आहे. गणेशोत्सवापुर्वी खड्डेमुक्त रस्ते करा, असे आदेश जिल्हाधिकारी यांनी दिले होते. परंतु, जिल्हाधिकारी यांच्या आदेशालादेखील बांधकाम विभागासह जिल्हा परिषद बांधकाम व राष्ट्रीय महामार्ग बांधकाम विभागाने केराची टोपली दाखविली आहे. खड्ड्यांची दुरुस्ती करण्यास संबंधित विभागाकडे निधीच उपलब्ध नसल्याने खड्डे बुजविण्याचे काम रखडले आहे काही विभागाकडे निधी असताना त्यांनी कामाचा दिखावा करीत मातीचा मुलामा डांबरी रस्त्यावर दिला. परंतु, पावसात माती पुर्णतः वाहून गेली आहे. त्यामुळे रस्त्याची अवस्था जैसे थे अशीच राहिली आहे. त्यामुळे रस्ता खड्ड्यात गेला असून निधी मंजूर झालेला रस्ता गेला कुठे, असा सवाल निर्लज प्रशासन व लोकप्रतिनिधींना विचारला जात आहे.






## अधिकाऱ्यांना दुर्लक्ष भोवण्याची चिन्हे

आमदारांच्या ठेकेदारांची मोठी लॉबी असून त्यांचा अधिकाऱ्यांवर मोठा दबाव असल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे यातील अनेक कामे संशयास्पद असल्याची चर्चा सध्या जोर धरु लागली आहे. या खड्डेमय रस्त्यावरुन प्रवास करताना अनेक अपघात झाले. मात्र, अद्यापही एकाही ठेकेदाराला काळ्या यादीत टाकले गेले नाही. यामागे कुणाचा वरदहस्त आहे, यावरही नाक्यानाक्यावर चर्चा सुरु आहे. मात्र, आता लवकरात लवकर रस्त्यांची दुरुस्ती न झाल्यास हजारो नागरिक रस्त्यावर उतरण्याच्या तयारीत आहेत. असे झाल्यास अधिकाऱ्यांना हे चांगलेच महागात पडणार आहे.

## निवडक



### जागतिक हृदय दिन साजरा

**पनवेल** : रोडपाली येथील व्हाईट लोटस हॉस्पिटलमध्ये जागतिक हृदय दिन साजरा करण्यात आला. या हॉस्पिटलच्या माध्यमातून समाजातील तब्बल ५०० रुग्णांना हृदयविकारासंदर्भातील विनामूल्य सल्ला देऊन प्रतिबंधक देखभाल कशी घ्यावी या संदर्भात माहिती देण्यात आली. रोडपाली येथे असलेल्या व्हाईट लोटस हॉस्पिटलने जागतिक हृदय दिनी विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजन केले होते. विविध वयोगटातील नागरिकांना हृदय रोग तज्ज्ञांशी चर्चा करून त्यांना हृदयरोगास संबंधित असलेले प्रतिबंधक उपाय, रोगाची प्रारंभिक लक्षणे व हृदयाचे आरोग्य चांगले जपण्यासाठी जीवनशैलीत कोणकोणते बदल करावे, याचे मार्गदर्शन केले.



### श्रीगावमध्ये रक्तदान शिबीर संपन्न

**श्रीगाव** : अलिबाग तालुक्यातील श्रीगाव येथे नवरात्रौत्सवाचे औचित्य साधून मरीदेवी मंदिरात रविवारी (दि.२८) श्री मरीदेवी ग्रामस्थ मंडळाच्यावतीने व रायगड जिल्हा शासकीय रक्त केंद्र अलिबाग यांच्या सौजन्याने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी श्रीगावसह परीसरातील रक्तदात्यांनी रक्तदान केले. या रक्तदान शिबिरात ५० हून अधिक रक्तदात्यांनी रक्तदान केले. यावेळी रक्त संकलन करण्यासाठी रायगड जिल्हा सामान्य रूग्णालयाच्या रक्तपेढीचे जिल्हा रक्त संक्रमण अधिकारी डॉ. दिपक गोसावी आणि इतर सहकाऱ्यांनी मोलाचे योगदान दिले. रक्तदान करणाऱ्या रक्तदात्यांना जिल्हा रक्तपेढीतर्फे प्रमाणपत्र व मरीदेवी ग्रामस्थ मंडळातर्फे वृक्ष भेट देऊन सन्मान करण्यात आला.

## संकुलातील रहिवाशांची रस्त्यासाठी वानवा



| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यातील उमरोली ग्रामपंचायतमधील डिकसळ तसेच अनेक गृह संकुलातील रहिवाशी यांना अनेक सोयी सुविधा यांची वानवा आहे. उमरोली ग्रामपंचायत परिसरात मोठ्या प्रमाणात बांधकाम क्षेत्र फोफावत आहे. घराच्या किमती ही वाढल्या आहेत. मात्र, गृह संकुलाकडे जाणाऱ्या रस्त्यांची दुरवस्था झालेली आहे. तसेच, सांडपाणी वाहून नेण्यासाठी गटारे नसल्यामुळे या रस्त्यावर सांडपाणी जागोजागी साठत असल्याचे चित्र रहिवाशी संकुलात दिसून येत आहे. कचरा कुंडी सारख्या मूलभूत सुविधा देखील नसल्यामुळे या रस्त्याच्या कडलेचा कचरा साचला फेकला जात आहे. तसेच, येथील रस्ते आजही मातीचे आहेत.

## रस्त्याची कामे तात्काळ पूर्ण करा: तटकरे

| रायगड | प्रतिनिधी |

जिल्ह्यात अनेक रस्त्यांची कामे सुरु असून ती कामे लवकरात लवकर पूर्ण करावीत, असे निर्देश खासदार सुनिल तटकरे यांनी जिल्हा नियोजन भवन हॉल येथे आयोजित विविध विषयांच्या आढावा बैठकीत उपस्थित अधिकाऱ्यांना दिले.



यावेळी जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अपर जिल्हाधिकारी सुनिल थोरवे, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, उप वनसंरक्षक अलिबाग राहुल पाटील, उपजिल्हाधिकारी रविंद्र शेळके, उपमुख्य कार्यकारी सत्यजित बडे आदी उपस्थित होते.

खासदार सुनिल तटकरे म्हणाले की, वडखळ-अलिबाग रस्त्याचे काम, बेलकडे मार्गे अलिबाग-रोहा रस्त्याची प्रलंबित असलेली कामे तसेच रस्त्यावरील खड्डे भरण्याची कार्यवाही तातडीने पूर्ण करावी. त्याचप्रमाणे राजेवाडी ते म्हाप्रळ या नॅशनल महामार्गाच्या कामामध्ये काही अडी-अडचणी असतील तर त्या सोडवून ते काम लवकरात लवकर पूर्ण करावेत. मुंबई-गोवा महामार्गावरील इंदापूर व माणगाव येथील बायपासची कामेपण सुरु करावीत. नातेखिंड ते रायगड हा रस्ता जवळपास पूर्णत्वाच्या मार्गावर असून तेथील कामे प्रलंबित असतील तर ती कामे तातडीने पूर्ण करण्यावर भर द्यावा. मुरुड तालुक्यात मोठ्याप्रमाणावर पर्यटक येत असतात त्यामुळे साळाव ते मुरुड रस्ता तसेच रोहा ते आगरदांडा रस्त्याची कामे पूर्ण करावीत. असे आदेश दिले आहेत.

खासदार सुनिल तटकरे यांनी रस्ते तात्काळ पूर्ण करण्याचे आदेश यंत्रणेला दिले असले तरी तटकरेंच्या या आदेशाची अंमलबजावणी फास्ट ट्रॅकवर घेण्यात येईल का, ही एक शंका नागरीकांच्या मनामध्ये उपस्थित झाली आहे. कारण गणेशोत्सवापूर्वी देखील बैठक घेऊन तटकरे यांनी रस्ते पूर्ण करण्याच्या संदर्भातील आदेश दिले होते. त्यानंतर नवरात्रोत्सव संपला तरी ते रस्ते तात्काळ दुरूस्त झाले नाहीत.

## स्टेशन परिसराची दुरवस्था उघडकीस

**स्वच्छ सर्वेक्षण अभियानावर प्रश्नचिन्ह?**
**सजग नागरिक मंचाने केली पोलखोल**

| नवी मुंबई | प्रतिनिधी |

सजग नागरिक मंचाच्या सदस्यांनी बेलापूर परिसराला भेट दिली असता अनेक समस्या समोर आलेल्या आहेत. स्टेशनमधील ड्रेनेजचे पाणी रस्त्यावर साचणे, तीन महिन्यांपूर्वी केलेल्या डांबरी रस्त्याची दुरवस्था, अर्बन हटच्या भिंतीच्या कोसळण्याचा धोक्यामुळे रेल्वे प्रवाशांना जीव मुठीत घेऊन ये-जा करणे, अस्वच्छता व दुर्गंधी यामुळे रेल्वे प्रवाशांच्या आरोग्याला निर्माण झालेला धोका, स्टेशन परिसराला फेरीवाल्यांचा विळखा व त्यामुळे रेल्वे प्रवाशांना स्टेशनमध्ये ये-जा करताना होणार त्रास, स्टेशन परिसरात अनेक ठिकाणी पेव्हरब्लॉकस खचल्याने पडलेले खड्डे व असमतल रस्ते अशा अनेक समस्या निर्दशनास आलेल्या आहेत. रेल्वे प्रवाशांनी याबाबत संताप व्यक्त करत म्हटले आहे की, भविष्यात केंद्राच्या स्वच्छ सर्वेक्षण अभियान निरीक्षण समितीने महानगरपालिका अधिकारी दाखवतील तीच स्थळे पाहून गुण देण्याऐवजी, प्रत्यक्ष नागरिकांना समवेत घेऊन सर्व परिसराची सखोल पाहणी करावी. अन्यथा केवळ झापडबंद पद्धतीने तपासणी करून



शहराला क्रमांक देण्याचा प्रकार हा वास्तव लपविणारा आहे व स्वच्छ शहराच्या बाबतीत दिशाभूल करणारा ठरतो. वर्तमानातं स्वच्छ सर्वेक्षणातील नागरिक सहभाग केवळ दिखावा असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

## हेटवणे येथील गतिरोधकाजवळ खड्डा



- **चारचाकी वाहनांसह दुचाकी वाहनांचा आदळआपट**
- **वाहन चालकांना मोठा त्रास**

| सुतारवाडी | प्रतिनिधी |

पेण जवळील हेटवणे येथील बस थांब्याच्या बाजूला गतिरोधक आहे. या गतिरोधका समोरच रस्त्यावर मोठा खड्डा पडलेला आहे. त्यामुळे येथून ये-जा करणाऱ्या दुचाकींसह चारचाकी वाहनांची आदळआपट होत असते. त्यातच कोलाडपासून विले भागाडपर्यंत रस्त्यावर जागोजागी पडलेले खड्डे पडले आहेत. या खड्ड्यांमुळे रस्ताच शिल्लक राहिलेला नसून ठिकठिकाणी खड्ड्यांचे साम्राज्य पसरलेले आहे. एकंदरीत या रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झालेली दिसत आहे. सतत पडणाऱ्या पावसामुळे रस्त्यावर पडलेले खड्डे पावसाच्या पाण्याने भरत असल्यामुळे ते खड्डे वाहन चालकांना दिसत नाहीत. त्यामुळे वाहन चालकांना मोठा त्रास सहन करून मार्ग काढावा लागत आहे. जागोजागी पडलेल्या खड्ड्यांमुळे प्रवाशांना मणक्याचा त्रास जाणवत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने आता तरी खड्डे बुजवावेत, अशी प्रवाशांची मागणी आहे.

## महिसदरा पुलावर जीवघेणा खड्डा



| कोलाड | प्रतिनिधी |

मुंबई-गोवा महातार्गावरील पुई गावाच्या हद्दीत असणाऱ्या महिसदरा नदीवरील पुलाच्या मधोमध मोठा जीवघेणा खड्डा पडला आहे. या महामार्गावर दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या रहदारीचा विचार करता या खड्डयांमुळे या पुलावरून प्रवास करणाऱ्या वाहचालकांसहित प्रवाशांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे. त्याकडे संबंधित विभागाचे दुर्लक्ष होत असुन कोणाचा नाहक बळी गेल्यानंतर हा खड्डा भरला जाईल का, अशी संतप्त प्रतिक्रिया प्रवासी वर्गातून व्यक्त होत आहे.

मुंबई-गोवा महामार्गावरील मुंबई-बाजुकडून कोलाड बाजूकडे जाणाऱ्या महिसदरा नदीपुलावर गेल्या काही दिवसांपासून मोठा जीवाघेणा खड्डा पडला आहे. या खड्ड्यातून मार्ग काढताना वाहचालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. तर, दोन दिवसांपूर्वी एक स्कुटी चालक या खड्ड्यात पडून जखमी झाला असून सुदैवाने तो थोडक्यात बचावला. त्यामुळे संबंधित बांधकाम विभागाकडून हा खड्डा त्वरित भरला जावा, अशी मागणी प्रवासी वर्गातून व्यक्त होत आहे.

> **मुंबई-गोवा महामार्गावरील महिसदरा नदीच्या जीर्ण झालेल्या पुलाचे काम ५० वर्षांपूर्वी झाले होते. त्यामुळे या पुलाच्या जागी नवीन पुलाचे बांधकाम केले पाहिजे. परंतु, जुन्या पुलाचा जो भाग कोसळला होता तो भाग दुरुस्ती करून पुलाच्या दोन्ही बाजूचे कठडे नव्याने बांधण्यात आले. त्यामुळे हा पुल किती दिवस तग धरील हे पुलावर पडलेल्या मोठ्या खड्ड्यांमुळे दिसून येत आहे. या खड्ड्यांमुळे कोणाचा नाहक बळी गेला तर याला जबाबदार कोण?**
>
> **-दिनकर सानप, सामाजिक कार्यकर्ते, पुई**

**१८ किमीच्या रस्त्यावर जिवघेणे खड्डे** | **महामार्ग विभागासह आमदारांना चिंता नाही**

# पर्यटकांसाठी वडखळ ते अलिबाग 'खड्डेसफर'

| रोहा | प्रतिनिधी |

वडखळ ते अलिबाग रस्ता धोकादायक बनला असून वाढत्या अपघातांमुळे स्थानिक आणि पोलिसांचीही चिंता वाढली आहे. अलिबाग हा पर्यटनाचे शहर आहे. मात्र, स्थानिकांसह पर्यटकांना वखडळपासून अलिबागपर्यंत खड्ड्यांमधून कंबर आणि मान मोडून प्रवास करावा लागत आहे. यामुळे तीव्र संतापाची लाट आहे. या रस्त्याची एवढी दुरवस्था झालेली असताना लोकप्रतिनिधींना याची जाणीव तरी आहे का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

### पर्यटकांचे किती हाल करणार?

अलिबाग समुद्रकिनारा, अलिबाग तालुक्यातील नागाव, आक्षी, चौल, रेवदंडा, वरसोली, आवास, सारळ येथील समुद्रकिनारे, त्याचबरोबर तालुक्यातील धार्मिक स्थळे लक्षात घेता येथे वर्षभर पर्यटकांची वर्दळ असते. जिल्ह्यातील तसेच जिल्ह्याबाहेरून येणारे पर्यटक अलिबागला 'वडखळ-अलिबाग' या राष्ट्रीय महामार्गावरून येतात. खरे तर पर्यटनाकडे पाहून हा रस्ता रुंद आणि मजबूत तसेच आकर्षक व्हायला हवा. मात्र, वर्षानुवर्षे हा रस्ता दुर्लक्षित आहे. लोकांना गरज असल्याने ते खड्ड्यांमधून प्रवास करतात. राष्ट्रीय महामार्ग विभागाला रस्त्याशी देणेघेणे नाही, असा हा सगळा कारभार आहे. मधल्याकाळात या महामार्गाचे चौपदरीकरण करण्यात येणार असल्याने अलिबागच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित असलेल्या या महामार्गाचे हस्तांतरण केंद्राकडे झाले होते.

तुफान पावसामुळे वडखळ ते अलिबाग या १८ किलोमीटरच्या रस्त्यावर पडलेले लहान-मोठे जीवघेणे घड्डे, रस्त्याला जागोजागी पडलेल्या भेगा, उन्मळून पडणारे वृक्ष, संरक्षक कठड्यांची झालेली वाताहत, खंडाळे ते वाडगाव दरम्यानच्या मार्गाची अतिवृष्टीने वाहून गेलेली एक बाजू यामुळे या मार्गावर अपघात वाढत आहेत. शिवाय खड्ड्यांना चाळण केलेल्या रस्त्यामुळे वाहतुकीचा वेगही मंदावला आहे. वडखळ ते अलिबाग रस्ता ८० टक्के खड्ड्यांचा आहे, असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. मात्र, याकडे राष्ट्रीय महामार्ग विभागाचे लक्ष नाही आणि आमदार महेंद्र दळवी तसेच आमदार रवींद्र पाटील यांना चिंता नाही. त्यामुळे रस्त्यामुळे होणाऱ्या त्रासाबद्दल स्थानिकांकडून संताप व्यक्त होत आहे.याच मार्गावर २१ जुलै रोजी पळी नाक्याच्या पुढे असलेला मोठा खड्डा अपघातास कारणीभूत ठरला होता. या खड्ड्यामुळे तीन वाहने एकमेकांना धडकली होती. जीवितहानी झाली नाही मात्र, तिन्ही गाड्यांचे प्रचंड नुकसान झाले. खंडाळे गाव ते वाडगाव दरम्यान मार्गाची एक बाजू अतिवृष्टीत वाहून जवळच्या शेतात गेली. शेताचे नुकसान झाले. हे नुकसान पाहायला संबंधित विभागाचा एकही जबाबदार अधिकारी घटनास्थळी आला नाही.

# दक्षिणेतील विरोधाभास

तमिळ अभिनेता विजय याच्या पक्षाच्या सभेत झालेल्या चेंगराचेंगरीत ४१ जण ठार झाले. अनेक जण जखमी आहेत. गेल्या वर्षी विजय याच्या टीव्हीके पक्षाच्या पहिल्या मोठ्या सभेत अशीच चेंगराचेंगरी होऊन सहा जण मेले होते. परवाची सभा करूर इथे होणार होती. तिथे सात-आठ हजार लोकांची व्यवस्था होती. पण प्रत्यक्षात ३० हजार लोक जमा झाले आणि त्यातून हा प्रकार घडला. याला कोण जबाबदार आहे याची चौकशी सुरू आहे. गर्दीत पाण्याच्या बाटल्या वाटत असताना झुंबड उडून हा प्रकार झाला असे म्हणतात. एक झाडाची फांदी कोसळल्यामुळे गोंधळ झाला असेही काहींचे म्हणणे आहे. विजय सभेला तब्बल सहा तास उशिरा आल्याने गडबड झाली असे सत्तारुढ द्रमुकने म्हटले आहे. पोलिसांनीही विजय यांच्या पक्षाने कशी बेपर्वाई केली याचे पुरावे पत्रकार परिषदेत सादर केले आहेत. तर विजय यांच्या पक्षाने आपल्यावर राजकीय हेतूने कारवाई होत असून याचा तपास केंद्र सरकारच्या एनआयएमार्फत करावा अशी मागणी करण्यासाठी उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. तमिळनाडूमध्ये आजवर करुणानिधी व आता स्टालीन यांचा द्रवीड मुन्नेत्र कळघम व जयललितांचा अण्णा द्रमुक असे दोन प्रमुख पक्ष आहेत. तेच आतापर्यंत आळीपाळीने सत्तेत आले आहेत. गेल्या काही काळापासून भाजपने तिथे शिरकाव करण्याचे प्रयत्न चालवले आहेत. आधी त्यांनी जयललिता यांच्या अद्रमुकशी युती केली. नंतर आपल्या शिवसेनेप्रमाणे तो पक्ष फुटला. गेल्या लोकसभेत या दोन्ही गटांनी भाजपशी फारकत घेतली. पण आता त्यातील एका गटाला एकनाथ शिंदे यांच्याप्रमाणेच भाजपच्या मदतीने सत्तेत येण्याचे डोहाळे लागले आहेत. या प्रयत्नामध्ये कालांतराने इथे जसा शिंदे गटाला खच्ची करणार आहे तसाच तमिळनाडूमध्ये जयललितांचा अण्णा द्रमुक संपवणार आहे. पण सगळीकडच्या नेत्यांच्या डोळ्यावर पट्टी असते व त्यांना तात्कालिक लाभांच्या पलिकडे काही दिसत नाही. असो. याच राजकीय आखाड्यात विजय यांनी प्रवेश केला असून द्रमुक व अद्रमुक यांच्याहून वेगळे राजकीय अस्तित्व निर्माण करण्याचा प्रयत्न चालवला आहे.

### बेजबाबदारपणा

विजय यांनी या दोन्ही द्रमुक तसेच भाजपवर सातत्याने टीका केली आहे. त्यांच्या राजकीय प्रवेशामुळे नक्की कोणाचा फायदा होणार याची चर्चा चालू आहे. द्रमुकच्या राजकारणाला वैतागलेले लोक विजय यांच्याकडे गेलेच तर त्यांची मते कमी होऊन भाजप त्याचा लाभ उठवू शकेल अशी गणिते मांडली जात आहेत. त्यामुळेच विजय हे भाजपवर टीका करीत असूनही भाजपने त्यांना आपले मुख्य शत्रू मानलेले नाही. आता चेंगराचेंगरीच्या घटनेनंतर मुख्यमंत्री स्टालीन यांनी विजय यांना पोलिस तपास व कोर्टकचेऱ्यांमध्ये अडकवण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. भाजप कदाचित त्यांना केंद्रातून संरक्षण देऊन त्याची किंमत नंतर वसूल करील. चेंगराचेंगरीच्या वेळी विजय यांचे वर्तन अनाकलनीय होते. त्यांनी आपले भाषण अचानक संपवले व ते गर्दीत काय गडबड झाली हे पाहायला न थांबता विमानाने थेट चेन्नईला निघून गेले. नंतरही बराच काळ ते मिडियाशी बोलले नाहीत. त्यामुळे त्यांच्यावर टीका होत आहे. यंदा पहिल्यांदाच आयपीएल जिंकल्यावर बंगलोरच्या संघाचे विजयी स्वागत होणार होते. तिथेही अशीच चेंगराचेंगरी झाली व विजयी संघानेही दुर्घटनेबाबत अशीच बेपर्वाई दाखवली. त्यापूर्वी उत्तर प्रदेशात कुंभमेळ्याच्या वेळी झालेल्या चेंगराचेंगरीत अनेकांचे बळी गेले. पण योगी आदित्यनाथ सरकारने या बातम्या बराच काळ दाबून ठेवल्या. त्यावेळी गंगेवर स्नानासाठी व्हीआयपी लोकांसाठी वेगळी आंघोळ व वेगळी व्यवस्था करण्यात आल्याने सामान्य लोकांच्या भागातील गर्दी वाढली व त्यातूनच लोकांचे बळी गेले. मात्र त्याविषयी अशीच बेपर्वाई दाखवण्यात आली. याच दरम्यान, दिल्लीच्या रेल्वे स्टेशनवर जी चेंगराचेंगरी झाली तिच्या बातम्याही दडपण्याचा भाजप सरकारने प्रयत्न केला. विजय यांच्या सभेतील दुर्घटनेनंतर तमिळनाडूमध्ये निर्मला सीतारामन, हेमा मालिनी यांच्यापासून अनेक भाजप नेत्यांनी भेटी दिल्या. पण हेच लोक दिल्ली किंवा उत्तर प्रदेशात मात्र गायब होते. राजकीय पक्ष काय किंवा सिनेमा स्टार वगैरे मंडळी काय, गर्दी जमवताना त्यांना मजा वाटते. शक्तिप्रदर्शन करण्यात धन्यता वाटते. पण अशी दुर्घटना घडली की ते पळून जातात किंवा मिडियाच्या बातम्या दडपू पाहतात.

### गर्दीचे अजब मानसशास्त्र

तमिळनाडूमध्ये पुढील वर्षी विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत. मोदींपासून सर्व नेत्यांच्या सभा वाढल्या आहेत. अभिनेता विजयचेही प्रयत्न त्यासाठीच आहेत. तमिळनाडू हे एरवी अत्यंत पुढारलेले राज्य आहे. तेथील विकासाच्या वाढीचा दर सर्वाधिक आहे. शिक्षणाचे प्रमाण केरळइतकेच चांगले आहे. मोटारी, वस्त्रोद्योग, संगणक अशा विविध प्रकारच्या व्यवसायांमध्ये या राज्याने भरारी घेतली आहे. कोईमतूरचा होजिअरी किंवा वॉटर पंप निर्माण करण्याचा उद्योग देशात अग्रेसर असून भारताला प्रचंड परकीय चलन मिळवून देत असतो. राजकारणात ओबीसी जातींना सत्तेत वाटा मिळवून देणारे हे पहिले राज्य होते. उद्योगांमध्ये व नोकऱ्यांमध्ये महिलांचा सहभाग अत्यंत लक्षणीय आहे. जागतिक अजिंक्यपद मिळवणारे बुद्धिबळपटू याच राज्यातून निर्माण झाले आहेत. पण गंमत अशी की, सिनेमा कलावंतांबद्दलचं अतर्क्य वेडही याच राज्यात पाहायला मिळतं. रजनीकांत, कमलाहसन यांचे फॅन्स त्यांच्यासाठी जीवही द्यायला तयार होतात. जयललिता कुठेही गेल्या तर त्यांच्यापुढे अक्षरशः लोळत लोटांगणे घालणारे असंख्य लोक दिसत. आधी एमजी रामचंद्रन व नंतर जयललिता वारल्या तेव्हा त्याच्या दुःखात अनेकांनी आत्महत्या केल्या. सिनेमा कलावंतांबद्दलचा हा भक्तिभाव तिथल्या देवांच्याही वाट्याला कदाचित येत नसावा. त्याचाच फायदा घेऊन हे कलावंत राजकारणात येतात. आता तर असे झाले आहे की, तमिळनाडूमध्ये सिनेमाची पार्श्वभूमी नसेल तर त्याला राजकीय नेता म्हणून करियर करणे अशक्य होऊन बसले आहे. करुणानिधी यांनी असंख्य सिनेमांचे लेखन केले. त्यांचा नातू व स्टालीन यांचा मुलगा उदयनिधी हा आता मंत्री असला तरीही सिनेमामध्ये कामे करतो व लोकप्रिय आहे. कमलहासन व रजनीकांत यांना राजकारणातले डावपेच जमले नाहीत. पण तरीही आता विजय हा आणखी एक अभिनेता आपले नशीब अजमावून पाहतो आहे. त्याने गेल्या वर्षभरात गर्दी तर चांगली जमवली आहे. पण ती मतात परिवर्तीत होईल की नाही हे कोणीही सांगू शकत नाही. शेजारच्या आंध्र प्रदेशाचे उदाहरण आहे. चिरंजीवी हा तिथला सुपरस्टार आहे. पण तो राजकारणात अयशस्वी झाला. असो. पण एरवी समजदार, शहाण्या व समंजस जनतेची अक्कल सिनेमा कलावंतापायी अशी मारली जावी हे दक्षिणेतील राज्यांना शोभणारे नाही. या राज्यांनी याबाबत विचार करण्याची वेळ आली आहे.

## विचार

# 'ब्रेन ड्रेन कसे वाढतेय? थांबवायचे कसे?

*भारतातून दरवर्षी १३ लाखांहून अधिक प्रतिभावान तरुण शिक्षणासाठी परदेशात जाऊन तिथेच रोजगाराच्या संधी शोधतात. हे 'ब्रेन ड्रेन' थांबवून देशाच्या विकासात या प्रतिभावंताचे योगदान मिळाल्यास देश वेगाने विकास साधेल. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या 'एच-वन बी' व्हिसाच्या निर्णयाच्या निमित्ताने हे 'ब्रेन ड्रेन' थांबवण्याची संधी आहे. त्यासाठी पगार, सुविधा, प्रगत देशांसारखे वातावरण तयार करण्याची आवश्यकता आहे.*

**भागवत सोनावणे**

भारताकडे जग एक समृद्ध, स्वतंत्र आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक अर्थव्यवस्था म्हणून पाहते. विकसित भारताच्या स्वप्नातील सर्वात मोठ्या अडथळ्यांपैकी एक म्हणजे 'ब्रेन ड्रेन.' ब्रेन ड्रेन ही भारतात एक प्रमुख चिंता बनली आहे कारण प्रतिभावान व्यक्ती इतरत्र चांगल्या संधींच्या शोधात स्थलांतर करतात. या परदेशगमनामुळे यजमान देशांना फायदा होतो, तर भारतासाठी असंख्य समस्या निर्माण होतात. त्यात देशातील प्रतिभा कमी होणे आणि आर्थिक परिणामांचा समावेश होतो. स्वातंत्र्यानंतर, विशेषतः १९६० च्या दशकापासून भारताने आपल्या प्रतिभावान तरुणांचा एक मोठा गट परदेशातील संशोधन पदांवर आणि व्यवसायांमध्ये गमावला आहे. त्यामुळे देशाच्या प्रगती आणि समृद्धीला हानी पोहोचली. या 'ब्रेन ड्रेन'ने पाश्चात्य अर्थव्यवस्थांमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. अपुऱ्या पायाभूत सुविधांमुळे तसेच संशोधन आणि विकासासाठी निधीच्या कमतरतेमुळे शिक्षण, संशोधन आणि इतर क्षेत्रांमध्ये २०१४ पूर्वी संधींचा अभाव झाला होता. त्यांचे मनोबल सुधारण्यासाठी सरकारच्या इच्छाशक्तीचा अभाव तसेच रोजगारक्षेत्रात होणारा हस्तक्षेप यामुळे त्यांना स्थलांतर करणे भाग पाडले. प्रचंड क्षमता आणि विद्यार्थ्यांच्या कष्टाळूपणाचा फायदा परदेशांनी घेतला. तथापि, आता परिस्थिती लक्षणीयरीत्या बदलली आहे. कारण भारताने वैज्ञानिक संशोधन आणि विकासात गुंतवणूक वाढवली आहे, हे 'इस्रो'च्या अलीकडील कामगिरीवरून दिसून येते. 'डीआरडीओ' ला बळकटी देण्याच्या सरकारच्या प्रयत्नांमुळे इतर गोष्टींबरोबरच, भारतातून सुरू असलेल्या 'ब्रेन ड्रेन'ला रोखण्यास मदत होईल. ताज्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर या वास्तवाचा विचार व्हायला हवा.

कौशल्य विकास, नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणाद्वारे वैज्ञानिक विचारांना प्रोत्साहन आणि प्रेरणा देणे आणि जागतिक दर्जानुसार शहरे बांधणे यासारख्या अतिरिक्त प्रयत्नांमुळे प्रतिभावान तरुणांना भारतात संधी असू शकते. असे असले, तरी आजच्या जागतिकीकृत जगात संधींचा फायदा घेण्यापासून आणि पुढे जाण्यापासून लोकांना रोखता येणार नाही. 'इंटरनॅशनल मायग्रेशन' अभ्यासानुसार, २००० ते २०२० दरम्यान जवळजवळ एक कोटी लोक स्थलांतरित झाले आहेत. त्यात भारतातून स्थलांतरित होणाऱ्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे. सरकारी अंदाजानुसार, अमेरिकेत सुमारे १२ टक्के शास्त्रज्ञ आणि ३८ टक्के डॉक्टर भारतीय असून 'नासा'चे ३६ टक्के किंवा दर दहापैकी चार शास्त्रज्ञ भारतीय आहेत. कॉर्पोरेट जगात 'मायक्रोसॉफ्ट'च्या कर्मचाऱ्यांपैकी ३४ टक्के, 'आयबीएम'चे २८ टक्के, 'इंटेल'चे १७ टक्के, 'झेरॉक्स'चे १३ टक्के आणि 'गुगल'चे बारा टक्क्यांपेक्षा जास्त कर्मचारी भारतीय आहेत. जगातील १८९ देशांमध्ये पसरलेले अंदाजे तीन कोटी वीस लाख भारतीय वार्षिक चारशे अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त आर्थिक उत्पन्न निर्माण करतात. ते भारताच्या सकल देशांतर्गत उत्पादनाच्या (एमईए) अंदाजे १३ टक्के आहे.

अमेरिकेतील दहा लाख भारतीय भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या अंदाजे दहा टक्के कमावतात; परंतु एकूण लोकसंख्येच्या केवळ ०.१ टक्का आहेत. २०२२ मध्ये रेमिटन्स म्हणजेच त्यांच्याकडून भारतात पाठवला जाणारा निधी ८९.१ अब्ज डॉलर्स होता. तो भारताच्या 'जीडीपी'च्या अंदाजे तीन टक्के आहे. दर वर्षी सुमारे दोन लाख विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी परदेशात जातात. परिणामी, दर वर्षी भारताबाहेर उच्च शिक्षणावर अंदाजे पन्नास हजार कोटी खर्च केले जातात. आर्थिक परिणामांव्यतिरिक्त 'ब्रेन ड्रेन'चे दूरगामी सामाजिक आणि सांस्कृतिक परिणामदेखील होतात. व्यावसायिक स्थलांतरामुळे सामाजिक रचनेवर परिणाम होतो. परिसर आणि समाजाचा विकास बदलतो आणि बौद्धिक चर्चेसाठी अयोग्य वातावरण निर्माण होते. भारतात राहणाऱ्या कुशल व्यक्तींच्या संख्येत घट, मार्गदर्शन आणि ज्ञान हस्तांतरणाचा अभाव यामुळे व्यावसायिक आणि नवोन्मेषकांची पुढील पिढी तयार करण्याची समुदायाची क्षमता कमी होते. परिणामी, देशात महत्त्वाकांक्षी व्यावसायिकांसाठी संधी कमी होतात. अवलंबित्वाचे चक्र निर्माण होते. परिणामी, बरेच लोक परदेशात करिअर करतात. शिवाय, बरेच स्थलांतरित त्यांच्या कौशल्यांना अनुकूल नसलेली पदे स्वीकारतात. त्यामुळे 'ब्रेन ड्रेन' होते. यामुळे रोजगार आणि कौशल्यांचे चुकीचे वाटप होते. त्याचा परिणाम भारत आणि यजमान देश अशा दोघांनाही होतो. कारण ते आपल्या प्रतिभेचा वापर करण्याची संधी गमावतात.

गेल्या दशकात, भारत गुंतवणुकीसाठी एक लोकप्रिय ठिकाण ठरले आहे. परवडणाऱ्या किमतीत कुशल कामगारांची उपलब्धता ही या पसंतीला चालना देणारी मुख्य कारणे आहेत. यामुळे जागतिक आर्थिक संकट असूनही भारत स्थिर वाढीच्या स्थितीत राहिला आहे. तथापि, भारतीय परराष्ट्र मंत्रालयाच्या अहवालांनुसार, दर वर्षी २.५ दशलक्ष भारतीय देश सोडून जातात. त्यामुळे ते जगातील सर्वात मोठे प्रवासी समुदाय बनतात. सरकारी आकडेवारी दर्शवते, की २०११ पासून १.६ दशलक्षाहून अधिक भारतीय नागरिकांनी त्यांचे नागरिकत्व सोडले आहे. त्यामुळे भारताचे कर महसुलाचे अब्जावधी डॉलर्सचे नुकसान झाले आहे. या घटनेचे वर्णन 'ग्रेट इंडियन ब्रेन ड्रेन' या संज्ञेत केले जात आहे. अनेक भारतीयांचे मित्र किंवा नातेवाईक परदेशात राहतात आणि ते त्यांच्या नातेवाईकांना त्यांच्या जीवनातील सकारात्मक बदलांबद्दल सांगतात. जीवनाचा दर्जा, सामाजिक कल्याण, आरोग्यसेवा, पायाभूत सुविधा, योग्य भरपाई आदींची माहिती ऐकून अनेक तरुण भारतीय निःसंशय या कथांनी प्रभावित झाले आहेत आणि त्यांनी परदेशात जाणे हे आपल्या जीवनाचे अंतिम ध्येय बनवले आहे. परदेशात कामाच्या ठिकाणी किरकोळ अत्याचार आणि वांशिक भेदभावाची असंख्य उदाहरणे आहेत, तरीही बरेच भारतीय अजूनही परदेशात काम करू इच्छितात. वसाहतवादाने भारताच्या जुन्या व्यवस्थांना नुकसान पोहोचवले असले, तरी काही सौंदर्यप्रसाधनात्मक सुधारणादेखील आणल्या. त्याने भारतीय संस्कृतीत मूलभूत बदल घडवून आणला. स्वातंत्र्य, समानता आणि मानवी हक्क या संकल्पना बदलल्या. इंग्रजी भाषा स्वीकारली गेली, तेव्हा भारतीय संस्कृती पाश्चात्य साहित्य आणि कलेच्या संपर्कात आली. त्यामुळे विचाराच्या आणि जगण्याच्या नवीन पद्धती निर्माण झाल्या. औद्योगिकीकरणामुळे स्थानिक कृषी उद्योग अडचणीत आले. ही धोरणे आणि बदलांमुळे कामगार कर्ज, गरिबी आणि बेरोजगारीच्या दुष्टचक्रात ढकलले गेले. आधुनिकीकरण, नवीन नोकरीच्या संधी आणि इंग्रजी शिक्षणाची गरज या संकल्पना आता भारतीय जगाच्या दृष्टिकोनात रुजल्या आहेत. भारतीय संस्कृती अधिकाधिक पाश्चात्य झाली आहे. अत्याधुनिक अन्न, कपडे आणि सामाजिक वर्तनाचे आगमन ही फक्त एक झलक आहे. खोलवर रुजलेली पारंपारिक मूल्येदेखील बदलली आहेत. त्यात व्यवस्थित विवाह, संयुक्त कुटुंबे, आदरातिथ्य, सहिष्णुता आणि यश म्हणजे आनंदी जीवन जगणे ही कल्पना समाविष्ट आहे. मूळ भारतीय पाश्चात्य प्रभावाला वाईट मानतात; परंतु पाश्चात्य जीवनशैलीने श्रीमंत आणि मध्यमवर्गीयांना जगाकडे पाहण्याचा एक नवीन दृष्टिकोन दिला. ते त्यांच्या सध्याच्या जीवनापेक्षा आकार आणि गुणवत्तेत खूपच श्रेष्ठ जीवनाची कल्पना करू लागले. परिणामी, भारतात भौतिकवाद आणि उपभोगवाद वाढला. श्रीमंत आणि गरीब यांच्यातील दरी वाढत आहे आणि सामाजिक असमानता कायम आहे. आता बरेच लोक पारंपारिक रीतीरिवाजांपेक्षा पाश्चात्य रीतीरिवाजांना प्राधान्य देतात. परदेशी पाककृतींचा आस्वाद घेणे, पॉप संस्कृतीचे कौतुक करणे आणि जागतिक फॅशन लेबल्सचे अनुसरण करणे यामुळे पारंपारिक भारतीय ज्ञान, कला आणि रीतीरिवाजांकडे दुर्लक्ष झाले आहे. पाश्चात्य लोकांना भारतात मान्यता मिळाली. कारण त्यांनी योग आणि वनस्पती-आधारित आहारासारख्या अनेक भारतीय रीतीरिवाजांचा स्वीकार केला. आपल्याला पाश्चात्यांकडून 'मान्यतेचा शिक्का' हवा आहे. हे वसाहतवादाचे परिणाम आहेत. त्यामुळे स्व-सांस्कृतिक ओळख नष्ट झाली. बहुतेक भारतीयांसाठी परदेशात काम करणे एक 'सिद्धी' आणि एक महत्त्वपूर्ण कामगिरी मानली जाते. सरकार, उद्योग आणि संस्था 'ब्रेन ड्रेन'चे 'ब्रेन गेन'मध्ये रूपांतर कसे करू शकतात, यावर बरेच काही अवलंबून आहे. 'ब्रेन ड्रेन'ला तोंड देण्यासाठी बहुआयामी दृष्टिकोन आवश्यक आहे. शिक्षण प्रणाली अपग्रेड करणे, संशोधन आणि विकास खर्च वाढवणे, उद्योजकतेची संस्कृती निर्माण करणे आणि कौशल्यांमधील तफावत कमी करणे हे महत्त्वाचे पाऊल आहे. 'रिसर्च पार्क' आणि 'युनिव्हर्सिटी नेटवर्क'सारख्या सरकारी कार्यक्रमांचे उद्दिष्ट देशांतर्गत प्रतिभा जोपासणे आहे. तथापि, पात्र व्यक्तींसाठी रोजगाराच्या संधी आणि इच्छित वातावरण प्रदान करण्यासाठी अधिक प्रयत्नांची आवश्यकता आहे. आर्थिक सुधारणा तसेच कायदेशीर आणि शैक्षणिक प्रणालींमध्ये बदल यामुळे भारतात मोठ्या संधी निर्माण झाल्या आहेत. 'रामानुजन फेलोशिप' जगभरातील प्रतिभावान भारतीय शास्त्रज्ञ आणि अभियंत्यांना भारतात संशोधन पदांवर आकर्षित करते. त्यामुळे त्यांना कौशल्ये दाखवण्याची अनोखी संधी मिळते. त्याचप्रमाणे 'व्हिजिटिंग ॲडव्हान्स्ड जॉइंट रिसर्च फॅकल्टी स्कीम' अनिवासी भारतीय शिक्षणतज्ज्ञांना भारतीय विद्यापीठांमध्ये संयुक्त संशोधन करण्यास प्रोत्साहित करते. या उदार निधीतून मिळणाऱ्या प्रकल्पांचा उद्देश भारतातील वैज्ञानिक समुदायात हुशार मनांना पुन्हा एकत्रित करणे आहे. 'एम. के. भान यंग रिसर्चर फेलोशिप प्रोग्राम' तरुण संशोधकांना पीएच. डी केल्यानंतर देशात राहण्यास प्रोत्साहित करतो. पंतप्रधानांच्या 'रिसर्च फेलो योजने'चा उद्देश 'ब्रेन ड्रेन' थांबवणे आणि 'ब्रेन गेन' वाढवणे आहे. असे असले, तरी अत्यंत मौल्यवान कौशल्ये असलेले लोक टिकून राहतील याची खात्री करण्यासाठी एक नावीन्यपूर्ण परिसंस्था स्थापित करणे आवश्यक आहे. भारताने सर्व क्षेत्रांमध्ये संशोधन आणि विकासाला समर्थन देणाऱ्या उपक्रमांवर लक्ष केंद्रित केले पाहिजे. संशोधन संस्था आणि संस्थांना सार्वजनिक पाठिंबा मिळवून नवोपक्रमाची संस्कृती निर्माण करून हे साध्य करता येते. कॉर्पोरेट क्षेत्र आणि सरकार संयुक्तपणे संशोधन आणि विकास प्रयत्नांमध्ये सुधारणा करण्यासाठी आणि देशातील नावीन्यपूर्ण प्रकल्पांवर काम करण्यासाठी व्यावसायिकांना संधी प्रदान करण्यासाठी संशोधन सहयोग स्थापित करू शकतात. नवोपक्रम केंद्रे किंवा टेक पार्क गुंतवणूकदार, संशोधक आणि उद्योजकांना सर्जनशीलता करण्यासाठी आणि सहकार्याला चालना देण्यासाठी एकत्र आणतात. पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्याचा आणखी एक मार्ग आहे.

## चर्चा आजची

# विकास हरवला आहे

**संतोष राऊळ**

विद्यमान सरकार गेल्या काही वर्षांपासून देशासह प्रत्येक राज्याच्या विकासाची गोष्ट करत आहे. विकासाच्या नावावरच आताचे सरकार निवडून आले आहे. गेल्या पाच-दहा वर्षांत त्यांनी विकास केल्याचा दावाही केला आहे. असे असतानाही विकास हरवला आहे, अशी ओरड सर्वसामान्य जनतेतून होत आहे.

निवडणूका होण्याआधी विद्यमान सरकारमधील उमेदवारांनी बोंब ठोकली होती की, आमचं सरकार निवडून द्या, आम्ही तुमचा विकास करू. निवडून आल्यावर दुसऱ्याच दिवशी स्वखर्चाने विकास कामांना सुरूवात करू. परंतु, काही उमेदवार दुसऱ्यांदा निवडून आले तरी विकास काही शोधून सापडत नाही. विकास झाला असेलच तर तो स्थानिक लोकप्रतिनिधींचा आणि संबंधित अधिकाऱ्यांचा, असे सर्वसामान्य जनतेतून बोलले जात आहे.

विद्यमान सरकार निवडून येण्याआधी आणि निवडून आल्यानंतरही पूर्वीच्या सरकार विरोधात बोंब ठोकत आहे. त्यांनी काहीच विकास केला नाही असं त्यांच मत आहे. प्रत्यक्षात मात्र विद्यमान सरकारही तेच करत असल्याचे बोलले जात आहे. गेल्या काही वर्षांपासून चर्चेचा विषय बनलेला मुंबई-गोवा महामार्ग अद्यापही पूर्ण झालेला नाही. त्या पावसळ्यात तर या रस्त्याची चाळण झाली असून सर्वसामान्यांचे कंबरडे मोडत आहे. त्याचबरोबर जिल्ह्याचे ठिकाण असलेल्या अलिबाग तालुक्यातील मुख्य रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. काही ठिकाणी साधारण १ ते २ फुट खोल खड्डे पडलेले आहेत. त्यामुळे दुचाकी चालकांना या रस्त्यावरून प्रवास करण डोकेदुखी ठरत आहे. अलिबागमधील कार्लेखिंड ते अलिबाग शहर आणि तेथून रोहा व रेवदंडा मार्गावर प्रचंड खड्डे पडले आहेत. या रस्त्यावरून प्रवास



करताना छोट्या चारचाकी वाहनापासून अवजड वाहनांना कसरत करावी लागते. तर, दुचाकी चालकांचे काय हाल होत असतील? एका खड्ड्यात जरी दुचाकी आपटली तरी गाडीसह शारीरीक नुकसान देखील होत आहे. एक खड्डा चुकविण्याच्या नादात आयुष्य गमवायची वेळ त्यांच्यावर ओढावत आहे. विद्यमान आमदार-खासदार त्यांच्या लाखो किमतीच्या आरामदायी गाडीतून फिरतात. त्यांनी दुचाकी घेऊन या रस्त्यावरून फेर फटका मारावा, म्हणजे कळेल, असे सर्वसामान्यांमधून बोलले जात आहे. आणि जनतेतून असेही बोलले जात आहे की, केवळ रस्त्याच्या वारंवार दुरूस्तीमुळे नेत्यांचे खिसेही गरम राहतात. त्यामुळे ते याकडे जाणिवपूर्वक दुर्लक्ष करतात. जेवढे खड्डे तेवढा स्वतःचा विकास, या विचाराने ते सर्वसामान्य जनतेला खड्ड्यात टाकत असल्याचे जनतेमधून बोलले जात आहे.

तसेच, जिल्ह्यात पाणी प्रश्न देखील गंभीर आहेत. यंदा पाऊस जास्त प्रमाणात पडला आहे. नदी व धरणे काठोकाठ भरली आहेत. असे असले तरीही काही शहरी भागांसह ग्रामीण भागात पाण्यासाठी वानवा होत आहे. काही ठिकाणी पाणी पोहोचूनही ते पीता येत नाही एवढे अशुद्ध पाणी असते. गेल्या काही वर्षांपासून सरकार पाणी योजना राबवत आहेत. परंतु, त्यातही मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत आहेत. त्याला स्थानिक लोकप्रतिनिधी आणखीच खतपाणी घालत असल्याचे बोलले जात आहे. तसेच, धरणांमधील पाण्यावर कोणतीही प्रक्रिया न करता थेट जनतेपर्यंत पाणी पोहोचवले जाते. त्यामुळे आधी जुन्या धरणांचा विकास करा मगच नव्याने धरणे बांधा. ते धरण सर्वसामान्य जनतेसाठी असले तरी ते धरण पूर्ण होईपर्यंत किती पिढ्या उलटतील याची गणनाच नाही. नवीन धरणाला मंजुरी भेटली तर येणाऱ्या निधीतून स्थानिक लोकप्रतिनिधींचा विकास होइल, असे जनतेतून बोलले जात आहे.

सध्या पावसाने देखील जिल्ह्यात धुमाकूळ घातला आहे. हातातोंडाशी आलेलं पीक मातीमोल झाले आहे. साधारणतः दिवाळी नंतर भाताच्या कापणीला सुरूवात होते. परंतु, पावसामुळे त्या आधीच कापणीची सुरूवात करण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. जर कापणी केलीच तरीही ते भिजण्याचा धोका आहेच. तशी ही समस्या दरवर्षीचीच झाली आहे. परंतु, अद्यापही सरकारला यावर तोडगा काढता आलेला नाही. असे कितीतरी महत्वाचे प्रश्न आहेत जे अद्याप भेडसावत आहेत. दरवेळेला निवडणूका आल्यावर आम्हाला मत द्या, आम्ही विकास करू म्हणणारे अशावेळी मात्र दडून बसतात ते पुन्हा निवडणूका आल्यावर बाहेर पडतात. त्यावेळी जर अशा समस्या उद्‌भवल्या तर त्या त्वरीत पुर्ण करतात. परंतु, इतर वेळी हे ढुंकुनही बघत नसल्याचे सर्वसामान्य जनतेमधून बोलले जात आहे.

त्यामुळे येणाऱ्या निवडणूक काळात आधी विकास शोधून द्या, मगच मत मागायला या, अशी भावना सर्वसामान्यांची झाली आहे.

## लोकसंसद

### कुविचारांचे दहन करायला हवे

दसऱ्याच्या दिवशी गावागावात शहरा-शहरात रावणाच्या पुतळ्याचे दहन केले जाते. समाजातील दृष्ट प्रवृत्तीचा संहार करण्याचे प्रतीक म्हणून आपण रावणाच्या पुतळ्याचे दहन करतो पण केवळ रावणाच्या पुतळ्याचे दहन करून समाजातील दृष्ट प्रवृत्ती संपणार नाही तर प्रत्येकाने स्वतः च्या मनातील रावणाचे म्हणजे कुविचारांचे दहन करायला हवे. दररोज वर्तमानपत्रात महिला अत्याचाराची एक तरी बातमी वाचायला मिळतेच. आज देशात कोणतीही महिला सुरक्षित नाही मग ती तीन वर्षाची चिमुरडी असोत की सत्तर वर्षाची आजी याचे कारण आहे आपल्या मनात लपलेला रावण म्हणजेच कुविचार. जोवर हा कुविचार नष्ट होत नाही तोवर या घटना थांबणार नाहीत. रावणाच्या पुतळ्याचे दहन करण्याऐवजी आपल्या मनातील या कुवीचारांचे दहन केले तर देशातील महिला सुरक्षित राहतील आणि महिलांना योग्य तो सन्मान मिळेल.

**– श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे**

### मुलांच्या आरोग्याकरिता धोक्याची घंटा

सरकारने ''चिल्ड्रेन इन इंडिया २०२५'' अहवाल तयार केला असून, त्यातून धक्कादायक अशी माहिती समोर आली आहे. देशातील ५ ते ९ वयोगटातील एक तृतीयांश मुलांमध्ये ट्रायग्लिसराइइसचे प्रमाण जास्त किंवा अधिक आहे. विशेषतः पश्चिम बंगाल, जम्मू-काश्मीर आणि ईशान्य भारतातील राज्यांतील या वयोगटातील मुलांमध्ये हे प्रमाण सर्वाधिक आहे. ट्रायग्लिसराइइसचे (रक्तातील चरबीचा एक प्रकार) प्रमाण उच्च पातळीवर असलेल्या मुलांना भविष्यात हदयविकार होण्याचा धोका होऊ शकतो.जन्मावेळी ऑक्सिजनचा अभाव किंवा बालकाला झालेली दुखापत तसेच न्यूमोनिया या कारणांनी नवजात बालकांचे मृत्यू होतात. तसेच देशात १६% किशोरवयीन मुलांमध्ये ट्रायग्लिसराइइसचे प्रमाण जास्त असल्याचेही आढळून आले आहे. पश्चिम बंगाल ६७%, सिक्कीम ६४% नागालँड ५५%, आसाम ५७%,जम्मू-काश्मीर ५०% महाराष्ट्र १९.१%, केरळ १६.६% मुलांमध्ये बालवयातच आढळलेले हे ट्रायग्लिसराइइसचे प्रमाण मुलांच्या आरोग्याच्या दृष्टीने गंभीर आणि चिंताजनक असेच म्हणावे लागतील.

**– दत्तप्रसाद शिरोडकर, मुंबई**

## दिनविशेष

# दसरा सणाला आपट्याची पानं न वाटता, रोपं वाटावीत...

दसरा सण मोठा, नाही आनंदाला तोटा..! विजयादशमी अर्थात दसरा उत्सव मोठ्या आस्थेने साजरा होतो. हा सण शौर्य आणि सामाजिक बांधिलकीचे नाते मनातील दुष्ट विचारांचे दहन करुन, उज्वल व प्रगतिमान दिशेने प्रगतीचा निर्धार करण्याचा दिवस असतो. या दिवशी सीमोल्लंघन, शमीपूजन, अपराजितापूजन आणि शस्त्रपूजा या चार गोष्टी केल्या जातात. आपट्याची पाने एकमेकांना भेट देवून प्रेम, आदर भावना व्यक्त केली जाते. ही पाने भेट देण्यासाठी अक्षरशः शहरांत आपट्याच्या झाडाच्या फांद्या तोडून ट्रक भरभरून येतात. जरी दसरा सणातून आनंद साजरा होत असलातरी त्यामागे पाहिले तर आपट्याचे झाड दिसेल तीथे त्याच्या फांद्या छाटून ते विक्रीला आणले जाते. फार मोठ्या प्रमाणात आपट्याची वृक्ष तोड होते. हे झाड तोडताना ते कधी कधी समूळ नष्ट होऊन जाते. त्याची उपयुक्तता पाहिलीतर महत्वाचे झाड आहे. अशी वनसंपदा आपण आपल्या हातून नष्ट करत आहोत. बदलत्या पर्यावरणाचे स्वरुप पाहून आज सणाला आपट्याची पानं न वाटता, रोपं वाटावीत ती मोठ्या प्रमाणे लावावीत. त्याचे संवर्धन व संरक्षण करावे. हीच खरी शौर्याची परंपरा होईल.

दसरा सणाला आपट्याची पानं का वाटतात यामागे एक पौराणिक कथा आहे. रघुराजाच्या दानशूरते विषयीची एक कथा 'रघुवंश' या काव्यात आहे. वरतंतु ऋषींकडे वेदाभ्यास करणाऱ्या कौत्स शिष्याला गुरूंना गुरुदक्षिणा द्यायची होती. गुरुनी नको म्हटले असतानाही कौत्सचा आग्रह पाहून त्याने हट्ट सोडवा म्हणून 'तू आता १४ विद्या शिकलास मग मला चौदा कोटी सुवर्णमुद्रा आणून दे.' असे म्हणता कौत्स रघुराजाकडे गेला. रघुराजानं नुकतीच सगळी पृथ्वी जिंकली होती. जिंकल्यावर विश्वजीत यज्ञ करुन आपली सगळी संपत्ती गरिबांत वाटून टाकली होती. तो स्वतः एका झोपडीत राहू लागला. रघुराजानं त्याची मागणी समजली त्यामुळे त्याने तीन दिवस मुदत मागितली. आता कुबेरावर स्वारी होणार हे समजता कुबेराने सुवर्णमुद्रांचा पाऊस पाडला. यातून कौत्सानं केवळ चौदा कोटी सुवर्णमुद्राच घेतल्या आणि वरतंतु ऋषींना दिल्या दोघांनी एकही जास्त मुद्रा घेतली नाही. उरलेल्या मुद्रा रघुराजाने आपट्याच्या आणि शमीच्या झाडाखाली ठेवली आणि कौत्सानं ते लोकांना लुटून घरी नेण्यास सांगितली. तो दसऱ्याचा दिवस होता. आता झाडाखालच्या सुवर्णमुद्रा लुटून नेण्यास सांगितल्या होत्या. झाडाची पाने फांद्या तोडण्यास नाही. मात्र लोकांनी पुढे ही परंपरा करुन तिचे संस्कृतीत रुपांतर केले. अशा अनेक परंपरेने पर्यावरणाचे नुकसान केले आहे. ते भरून काढण्यासाठी वृक्षारोपण गरजेचे आहे. दसऱ्याच्या आधी नऊ दिवस नवरात्र असते. या नऊ दिवसात देवीच्या शक्ती रुपांनी दाही दिशांवर विजय मिळवला. यातून विजया दिवसला दशहरा, दसरा व विजयादशमी नावे पडली. तसेच श्रीरामांनी रावणावर विजय मिळवला व रावणाचा वध केला. तोही याच दिवशी. विजयादशमी म्हणून हा सण सुरु झाला पुढे पांडवांचा अज्ञातवास संपल्यावर शक्तीपूजन करून शमीच्या वृक्षावरची आपली शस्त्रे परत घेतली. विराटाराजाच्या गायी पळवून नेणाऱ्या कौरव सैन्यावर स्वारी करुन विजय मिळवला, तोही याच दिवशी. या दिवशी सीमोल्लंघन, शमीपूजन, अपराजितापूजन आणि शस्त्रपूजा या चार परंपरा रूढवात झाल्या. या दिवशी दहा तोंडाचा रावण जाळला जातो. खरे पाहता मनातील विकार यांचा नाश करुन ईश्वराने आम्हाला ही पृथ्वी दिली तिची अशी वाताहत करण्यासाठी नाही, याची जाणीव झाली पाहिजे. आपट्याच्या झाडावर अनेक कीटक, फुलपाखरं यांची उपजीविका अवलंबून असते. या झाडापासून डिंग, धागे, टॅनिन मिळते. आपट्याच्या लाकडाचाही पूर्वी वापर होत असे तसेच पानांचा बिडी बनवण्यासाठीही वापर केला जात होता. सालीचा रस पचनसंस्थेच्या रोगांवर उपयुक्त, मुतखडा विकार औषधामध्ये आपट्याचा मोठ्या प्रमाणात वापर केला जात असे. तर याची पानं कफ आणि पित्त दोषांवर गुणकारी आहेत. या झाडाच्या शेंगा टणक असतात, त्या फुटून त्याचे बीज रोपण होण्यास मोठा काळ जातो. असे बहुगुणी झाड तोडल्याने पर्यावरणाचे नुकसान आहे.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**२ ऑक्टोबर**

१) श्री. शामराव बारक्या ठाकूर हाशिवरे, अलिबाग, १-१०-१९३५
२) श्रीम. पूर्णिमा भालचंद्र चव्हाण अलिबाग, १-१०-१९४९
३) श्रीम. प्रतिभा कुमार टोळ अलिबाग, १-१०-१९४५
४) श्रीम. सुनिता सुरेश तारे अलिबाग, १-१०-१९५२
५) श्री. अविनाश भगवान सुतार अलिबाग, १-१०-१९५६
६) श्रीम. विद्या पद्माकर कुवळेकर अलिबाग, १-१००१९५९
७) श्री. अलीम सत्तार शेख श्रीबाग, अलिबाग, २-१०-१९५२
८) श्रीम. मदुरा मदन मोरे अलिबाग, २-१०-१९५५

## सुवर्णकण



दुष्काळात आपली धान्याची कोठारे
गरीब लोकांना खुली करणाऱ्या
संत दामाजी पर्यंत सर्व थरांतील
व्यक्तीवर देवाने कृपा केलेली आहे
पतितपावन हे तर त्याचे नाव

**श्रीज्ञानेश्वरभावहृदय**
**आबामहाराज परांजपे**
**साधना आश्रम,**
**दातार आळी, पेण.**

## नथू शिंदे यांना देवाज्ञा

**। खांब । प्रतिनिधी ।**

रोहा तालुक्यातील शिरवली गावचे रहिवासी व मा. उपसरपंच नथू हरी शिंदे यांचे वयाच्या ८५ व्या वर्षी राहत्या घरी अल्पशा आजाराने



निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, एक मुलगी, नातवंडे असा परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी शनिवार दि.०४ ऑक्टोबर, तर अंतिम धार्मिक विधी मंगळवार दि. ७ ऑक्टोबर रोजी शिरवली येथील निवासस्थानी होणार असल्याची माहिती त्यांच्या निकटवर्तीयांकडून देण्यात आली आहे. नथू शिंदे यांनी आपल्या हयातीत खांब हायस्कूल येथे शिपाई पदावर आपला सेवाकाळ अतिशय प्रामाणिकपणे पूर्ण केला. तसेच, नेहमीच सामाजिक कार्यात सहभाग घेऊन आपल्या गावाच्या विकासासाठीही बहुमोलाचे योगदान दिले.

# बेलापूर स्टेशन परिसराची दुरवस्था

## स्वच्छ सर्वेक्षण अभियानावर प्रश्नचिन्ह; सजग नागरिक मंचाने केली पोलखोल

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

**नवी मुंबई शहराला केंद्र सरकारच्या स्वच्छता अभियानात देशात दुसऱ्या क्रमांकाचे स्वच्छ शहर म्हणून गौरविले आहे. परंतु, याच शहरातील प्रमुख स्टेशन असणाऱ्या बेलापूर रेल्वे स्टेशन परिसराची दुरवस्था पाहता या पुरस्काराच्या निकषांवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.**



सजग नागरिक मंचाच्या सदस्यांनी प्रत्यक्षात बेलापूर परिसराला भेट दिली असता अनेक समस्या समोर आल्या आहेत. स्टेशनमधील ड्रेनेजचे पाणी रस्त्यावर साचणे, तीन महिन्यांपूर्वी केलेल्या डांबरी रस्त्याची दुरावस्था, अर्बन हटच्या भिंती कोसळण्याच्या धोक्यामुळे रेल्वे प्रवाशांना जीव मुठीत घेऊन ये-जा करणे, अस्वच्छता व दुर्गंधी यामुळे रेल्वे प्रवाशांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. तसेच, स्टेशन परिसराला फेरीवाल्यांचा विळखा व त्यामुळे रेल्वे प्रवाशांना स्टेशनमध्ये ये-जा करताना होणार त्रास, स्टेशन परिसरात अनेक ठिकाणी पेव्हरब्लॉकस खचल्याने पडलेले खड्डे व असमतल रस्ते अशा अनेक समस्या निर्दशनास आल्या आहेत.

रेल्वे प्रवाशांनी याबाबत संताप व्यक्त करत म्हटले आहे की, भविष्यात केंद्राच्या स्वच्छ सर्वेक्षण अभियान निरीक्षण समितीने महानगरपालिका अधिकारी दाखवतील तीच स्थळे पाहून गुण देण्याऐवजी, प्रत्यक्ष नागरिकांना समवेत घेऊन सर्व परिसराची सखोल पाहणी करावी. अन्यथा केवळ झापडबंद पद्धतीने तपासणी करून शहराला क्रमांक देण्याचा प्रकार हा वास्तव लपविणारा व स्वच्छ शहराच्या बाबतीत दिशाभूल करणारा ठरतो. तसेच, स्टेशन परिसर हा सिडकोच्या अंतर्गत येत असल्याने व स्वच्छ सर्वेक्षण अभियान हे महापालिकेचे आहे, अशी ढाल पुढे करणे उचित ठरणार नाही. कारण स्टेशन परिसर हा शहराचा अत्यंत महत्वपूर्ण असा भाग असतो.

वर्तमानात स्वच्छ सर्वेक्षणातील नागरिक सहभाग केवळ दिखावा असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. स्वच्छ सर्वेक्षण अभियानाच्या वेळी नवी मुंबई महानगरपालिका नागरिकांकडून काही नळीने फॉर्म्स भरून घेतात. या प्रक्रियेत नागरिकांना केवळ हो किंवा नाही असे उत्तर देण्यापुरतेच मर्यादित केले जाते. प्रत्यक्ष नागरिकांची मते, सूचना किंवा तक्रारी लक्षात घेतल्या जात नाहीत. त्यामुळे स्वच्छ सर्वेक्षण अभियानाचा खरा चेहरा नागरिकांसमोर येत नाही.

### सिडको प्रशासनावर प्राथमिक जबाबदारी

सिडको प्रशासनाने रेल्वे स्टेशन परिसराच्या देखभालीची जबाबदारी अत्यंत जबाबदारपणे पार पाडावी, अशी नागरिकांनी मागणी केली आहे. बेलापूर स्टेशन परिसराची प्राथमिक जबाबदारी सिडको प्रशासनावर आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांनी या ठिकाणी डोळस पाहणी करून तातडीने सुधारणा कराव्यात. अन्यथा नागरिकांचे आरोग्य, सुरक्षितता व सोयीसुविधा धोक्यात राहतील.

> **नवी मुंबईतील सर्व रेल्वे स्टेशन इमारती व परिसरातील पायाभूत सुविधांची सिडकोच्या उच्चस्तरीय अधिकाऱ्यांनी स्थळ पाहणी करावी. त्याचबरोबर मागील ३ वर्षात नवी मुंबईतील रेल्वे स्टेशन ईमारत व परिसर देखभाल खर्चावरील श्वेतपत्रिका काढून तिचा तपशील सिडकोच्या संकेतस्थळावर अपलोड करावा.**
> **– सुदीप शहा, सदस्य, सजग नागरिक मंच, नवी मुंबई**



## महाविद्यालयात आर्थिक साक्षरता कार्यशाळा

**। उरण । प्रतिनिधी ।**

कोकण ज्ञानपीठ उरण महाविद्यालय वाणिज्य विभाग तसेच सेबी यांच्या संयुक्त विद्यमाने आर्थिक साक्षरता कार्यक्रम घेण्यात आला. याकरीता पालघर येथील सोनोपंत दांडेकर महाविद्यालयाचे प्रा. मकसूद मेमन यांनी सर्वांना मार्गदर्शन केले. सर्व विद्यार्थ्यांनी सुरुवातीपासूनच कोणकोणत्या अधिकृत मार्गाने बचतीची सवय लावावी व आपली प्रगती कशी करावी, याची माहिती दिली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाल्मीक गर्जे तसेच विभागप्रमुख प्रा. व्ही.एस. इंदुलकर यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## परतीच्या पावसामुळे भातशेतीचे नुकसान

**। तळा । प्रतिनिधी ।**

परतीच्या पावसामुळे तळा तालुक्यातील भातपिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. यामुळे शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण पसरले आहे.

तळा तालुक्याचा भाग हा अधिक प्रमाणात डोंगराळ वरकस भातशेतीचा आहे. यावर्षी लवकरच सुरू झालेल्या पावसामुळे तळा तालुक्यातील शेतकरी वर्गाने आपली शेतीची कामे लवकरच पूर्ण केली होती. त्यानुसार यावर्षी पिकदेखील लवकर येईल अशी अपेक्षा शेतकरी बांधवांना होती. सप्टेंबर महिना संपत आला असून बरेचशे शेतकरी ऑक्टोबर महिन्यात भात कापणीला सुरुवात करतात. मात्र, परतीच्या पावसामुळे भातकापणी लांबणीवर गेली आहे. दिवसेंदिवस पावसाचा जोर कायम रहात असल्यामुळे उरलेल्या भातशेतीचेदेखील मोठे नुकसान होत आहे. हातातोंडाशी आलेला घासदेखील हिरावून जातो की काय, अशी भीती बळीराजाला वाटू लागली आहे.

### शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण



> **शेती पाण्याखाली गेल्याने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला आहे. त्यामुळे प्रशासनाने तळा तालुक्यातील नुकसान झालेल्या शेतीचें पंचनामे करून तालुक्यातील शेतकऱ्यांना तात्काळ नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी आहे.**
> **– चंद्रकांत राऊत, अध्यक्ष, तळा तालुका शेतकरी संघटना**

## डॉ. श्रीनिवास जोशी यांचा सन्मान

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

गोखले एज्युकेशन सोसायटी संचलित कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय श्रीवर्धनचे प्राचार्य डॉ. श्रीनिवास जोशी ४२ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त होत आहेत. यानिमित्ताने कोकण मराठी साहित्य परिषद श्रीवर्धन, ज्येष्ठ नागरिक संघ श्रीवर्धन, कनिष्ठ महाविद्यालय, न्यू इंग्लिश स्कूल व न्यू मॉडर्न इंग्लिश स्कूल बोर्ली आणि वरिष्ठ महाविद्यालय श्रीवर्धन यांच्या वतीने प्राचार्य डॉ. श्रीनिवास जोशी यांचा सन्मान करण्यात आला.




यावेळी बोलताना ज्येष्ठ शिक्षक नरहर बापट म्हणाले की, समाजात अशांतता वाढत असतानाच असूरी, दुष्ट, आणि नकारात्मक प्रवृत्ती शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रात वाढत आहेत. प्रामाणिकपणे काम करणाऱ्या व्यक्तीला प्रत्येक क्षेत्रात त्रास, अपमान व मनस्ताप सहन करावा लागत आहे. परिणामी अशी व्यक्ती बाजूला फेकली जात आहे. तर ज्येष्ठ पत्रकार आनंद जोशी यांनी म्हटले की, श्रीवर्धन शहराचे आणि महाविद्यालयाचे सुदृढ व निरोगी संबंध प्राचार्य डॉ. जोशी यांनी निर्माण केले. त्याचबरोबर विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध व व्रतस्थ भावनेतून काम करताना शिक्षक म्हणून मला त्यांचा अभिमान वाटतो.

## नवदुर्गांचा सत्कार सोहळा

**। उरण । प्रतिनिधी ।**

श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेच्या माध्यमातून दरवर्षी विविध उपक्रम राबविले जातात. समाजातील सर्व क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या महिलांचा योग्य मानसन्मान व्हावा, त्यांच्या कार्याची इतरांना ओळख व्हावी, महिलांना समाजात पुढे जाण्याची प्रेरणा मिळावी, समाजातील शेवटच्या घटकाला मान सन्मान मिळावा, न्याय मिळावा या अनुषंगाने या संस्थेच्या माध्यमातून दरवर्षी नऊ महिलांचा (नवदुर्गांचा) सन्मान करण्यात येतो. याही वर्षी संस्थेच्या माध्यमातून रँकर्स अकॅडमी, कोप्रोली चौक, उरण येथे नवदुर्गांचा सत्कार सोहळा मोठा उत्साहात पार पडला.

यावेळी समिधा निलेश म्हात्रे (सामाजिक क्षेत्र), डॉ. जागृती म्हात्रे (वैद्यकीय क्षेत्र), तृप्ती भोईर (पत्रकारिता), हेमांगी नरेश म्हात्रे (शेतकरी क्षेत्र), निर्मला नरेश म्हात्रे (आशा वर्कर), हर्षा लीलाधर ठाकूर (स्वच्छता कर्मचारी), ॲडवोकेट माधवी पाटील (न्यायदान क्षेत्र), निर्मला मच्छिंद्रनाथ घरत (शिक्षण क्षेत्र), अपर्णा अंकित म्हात्रे (पोलीस प्रशासन) या नवदुर्गांचा शाल गुलाब पुष्प प्रशस्तीपत्र, सन्मान चिन्ह, साडी देऊन सत्कार करण्यात आला.

## महावितरणच्या महिला कर्मचाऱ्यांचा सन्मान

**। कल्याण । प्रतिनिधी ।**

नवरात्रीच्या निमित्ताने कल्याण परिमंडळात सन्मान सौदामिनीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी वीजपुरवठासारख्या जोखमीच्या क्षेत्रात कार्यरत महावितरणमधील महिला अभियंता, अधिकारी आणि कर्मचारी यांचा मुख्य अभियंता चंद्रमणी मिश्रा यांनी गुलाब पुष्प देऊन सन्मान केला.

यावेळी बोलताना मुख्य अभियंता चंद्रमणी मिश्रा यांनी महावितरण प्रशासनामध्ये कार्यरत महिला अधिकारी, कर्मचारी यांची दखल घेऊन अशा प्रकारचा कार्यक्रम आयोजित केला असल्याचे सांगितले. यावेळी उपस्थित कौमुदी परदेशी, स्मिता काळे आणि सावनी मालंदकर, शर्वरी पाटील, स्मिता साळुंखे, पौर्णिमा उदावंत, मयुरी बोरसे, सिद्धी देसाई, नीलिमा रणदिवे, तृष्णा सोनवणे, ज्योती जाधव, दर्शना कारेकर यांचा सन्मान करण्यात आला.

## पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ

**। नाशिक । प्रतिनिधी ।**

राज्यातील पुरपरिस्थितीमुळे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज भरण्यासाठी विनाविलंब शुल्कासह दि.०७ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. आधी ही मुदत दि.०१ ऑक्टोबरपर्यंत होती. विद्यापीठाच्या विविध शिक्षणक्रमाच्या (कृषी पदविका शिक्षणक्रम वगळता) पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांची परीक्षा संभाव्यपणे येत्या दिनांक २३ डिसेंबर २०२५ पासून आयोजित करण्याचे विद्यापीठाचे नियोजन आहे. त्यामुळे सर्व पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांनी अनुत्तीर्ण विषयाचे परीक्षा अर्ज विद्यापीठाच्या संकेत स्थळास भेट देवून लवकरात लवकर ऑनलाईन पद्धतीने भरावेत, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने करण्यात आलेले आहे.

शैक्षणिक वर्ष २०२५- २६ च्या विविध शिक्षणक्रमात प्रवेशित नियमित विद्यार्थ्यांची सत्र व मागील परीक्षेतील अनुत्तीर्ण विषयाची पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांची हिवाळी परीक्षा येत्या २३ डिसेंबर २०२५ पासून आयोजित करण्याचे विद्यापीठाचे नियोजन आहे. पूर पुरपरिस्थितीमुळे या परीक्षेकरिता ऑनलाईन परीक्षा अर्ज विनाविलंब शुल्कासह सादर करण्यास दिनांक ०१ ऑक्टोबर ते ०७ ऑक्टोबर २०२५ अशी मुदतवाढ देण्यात आली आहे. विलंब शुल्कासह दिनांक ०८ ते १३ ऑक्टोबरपर्यंत तर विशेष विलंब शुल्कासह दिनांक १४ ते १८ ऑक्टोबरपर्यंत हा ऑनलाईन परीक्षा अर्ज भरता येईल. मात्र, यानंतर कुठल्याही कारणास्तव मुदतवाढ मिळणार नाही. ऑनलाईन परीक्षा अर्ज हा **https://ycmou.digitaluniversity.ac/PreExamv2_ExamformSubmission_PpAmAtWise.aspx** या लिंकवर उपलब्ध आहे. तसेच, परीक्षा शुल्क हे केवळ ऑनलाईन भरता येईल.

### वैद्यकीय अधीक्षक डॉ. सविता कालेल यांचे उद्‌गार | चौक ग्रामीण रुग्णालयात आरोग्य तपासणी शिबीर

# उपासनेबरोबर घरच्या देवीची काळजी घ्यावी

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

घरची देवी स्वस्थ तर परिवार स्वस्थ. त्यामुळे नवरात्रीच्या देवी उपासनेबरोबर घरच्या देवीची काळजी घेणे आवश्यक आहे, असे उद्‌गार चौक ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ.सविता कालेल यांनी काढले. 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' या अभियानाच्या अंतर्गत चौक ग्रामीण रुग्णालयात महिलांची विशेष आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी त्या बोलत होत्या.



'स्वस्थ नारी सशक्त नारी' हे अभियान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेले एक राष्ट्रव्यापी आरोग्य उपक्रम आहे. १७ सप्टेंबर २०२५ ते २ ऑक्टोबर २०२५ या काळात हे अभियान राबवण्यात येत आहे. या अभियानांतर्गत महिलांसाठी विशेष आरोग्य तपासणी शिबिरे आणि मार्गदर्शन कार्यक्रम चौक ग्रामीण रुग्णालयात आयोजित करण्यात आले होते. यात योग प्रशिक्षण, योग साधनेचे महत्व सांगण्यात आले. महिलांची कर्करोग तपासणी, हिमोग्लोबीन वाढवण्यासाठी औषधे यांचे वाटप, गरोदर महिला, स्तनदा माता यांना पौष्टिक आहार देणे, महिला आरोग्य साक्षर जनजागृती, दंत चिकित्सा, कुटुंब नियोजन, कुष्ठरोग आणि क्षयरोग याची माहिती व त्यावर उपचार इ. माहिती देण्यात आली.

यावेळी डॉ. सविता कालेल यांनी सांगितले की, गर्भधारणेपूर्वी दंत चिकित्सा करून घेणे आवश्यक आहे, त्याचप्रमाणे गरोदरपणाच्या पहिल्या तीन महिन्यात बाळाच्या मेंदूची क्षमता वाढविण्यासाठी वैद्यकीय तपासणी करणे आवश्यक आहे. यावर प्रामुख्याने भर देण्यात आला. डॉ. प्रमोद वानखेडे बालरोग तज्ञ खोपोली, डॉ. प्रणिता कांबळे त्वचा रोगतज्ञ मोहोपाडा डॉ. प्रतिक झेंडे बालरोग तज्ञ कशेळी, डॉ. दिपक अढकमोल अस्थी रोग तज्ञ, योग शिक्षिका सीमा रोजा अलिबाग यांनी मार्गदर्शन केले.

> **महिलांचे आरोग्य सुधारणे, शरीरातील रक्ताची कमतरता (ॲनिमिया), उच्च रक्तदाब, मधुमेह, कर्करोग आजारांची तपासणी करणे, महिलांना आरोग्य साक्षर बनवून त्यांना आरोग्य सेवा आणि उपक्रमांची माहिती देण्यासाठी या शिबिराचा उद्देश होता.**
> **– डॉ. सविता कालेल, वैद्यकीय अधीक्षक, चौक ग्रामीण रुग्णालय**

## निवडक

### शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानतर्फे दुर्गामाता दौड

**शिहू** : श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानच्या वतीने रविवारी (दि.२८) दुर्गामाता दौडचे आयोजन करण्यात आले होते. पृथ्वी तलावर जेंव्हा जेंव्हा संकट येते, तेंव्हा आई जगदंबा दुर्गेचा अवतार घेते. दुर्गामाता दौड या शब्दातच या शब्दाची ताकत आणि सारा अर्थ समावलेला आहे. ही दौड म्हणजे हिंदूधर्म रक्षितेचे एक प्रतीक. म्हणून नवरात्रीच्या घटस्थापनेपासून विजयादशमीपर्यंत सर्वत्र या दौडीचे आयोजन केले जाते. श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान शिहूच्या वतीने काढण्यात आलेल्या दौडीमध्ये तरुणांसह महिलांनी ही सहभाग घेतला होता. डोक्यावर भगवे फेटे परिधान करून हातात भगवे झेंडे घेऊन आई जगदंबेचा, छत्रपती शिवाजी महाराज, धर्मवीर संभाजी महाराज यांच्या नावाचा उद्घघोष करत दुर्गामाता दौड काढण्यात आली. प्रत्येक भागात या दुर्गामाता दौडचे उत्साहात स्वागत करण्यात आले.





### श्रमिक विद्यालयात सापांविषयी प्रबोधन

**खांब** : नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब संचलित श्रमिक विद्यालय चिल्हे येथे शारदोत्सव कार्यक्रम साजरा करण्यात आला. याप्रसंगी सुदर्शन केमिकल्स कंपनी धाटाव यांचे सीएसआर फंड व सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्था कोलाड-रोहा यांच्या वतीने सापांविषयी प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात सागर दहिंबेकर यांनी चित्रफितीद्वारे विषारी व बिनविषारी साप कोणते, सापांच्या जाती व प्रकार तसेच सापांबद्दल समाजात पसरलेले गैरसमज याबाबत माहिती सांगितली. तसेच, साप हे शेतकरी वर्गाचे कसे मित्र आहेत, त्याचप्रमाणे पर्यावरणाच्या साखळीत सापांचे असणारे महत्व याबाबत माहिती सांगितली. यावेळी मुख्याध्यापक दिपक जगताप, सरपंच रवींद्र मरवडे, सह्याद्री संस्थेचे प्रमुख सागर दहिंबेकर व सहकारी परेश महाबळे, सिद्धार्थ पवार, सागर सुतार, श्वेता विश्वकर्मा आदी प्रमुख मान्यवर उपस्थित होते.



### हार्बर रेल्वेत दसऱ्याचा सोहळा

**पनवेल** : दसरा सणाच्या पूर्वसंध्येला मुंबईच्या जीवनवाहिनी ठरलेल्या पनवेल रेल्वे स्थानक हार्बर रेल्वेत प्रवाशांनी अनोखा सोहळा साजरा केला. सकाळी चाकरमान्यांनी आपल्या रोजच्या सहप्रवाशांसोबत रेल्वेला हार अर्पण करून, आपट्याची पाने लावून व नारळ फोडून पूजा केली. यावेळी रेल्वेचे मोटरमन यांचा शाल, टोपी व मिठाई देऊन सत्कार करण्यात आला. दररोज प्रवाशांना सुखरूप गंतव्यस्थानी पोहोचवणाऱ्या रेल्वेबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याची ही अनोखी परंपरा सर्वांनी जपली. 'गणपती बाप्पा मोरया' आणि 'अंबे माता की जय'च्या घोषणांनी संपूर्ण डबा उत्साहात दुमदुमून गेला. मोबाईलमध्ये गुंतलेल्या आजच्या जगात, हा डबा प्रवाशांना एकत्र आणतो, दुःख-आनंद वाटून घेतो आणि सण एकत्र साजरा करतो. या उपक्रमातून एक वेगळी सामाजिक बांधिलकी आणि मैत्रीची भावना अधोरेखित झाली.



### अमरधाम स्मशानभूमीत स्वच्छता मोहीम

**पनवेल** : पनवेल शहरातील मुंबई-पुणे महामार्गालगत असलेल्या अमरधाम स्मशानभूमीची दुरवस्था लक्षात घेऊन अखेर साफसफाई कामाला सुरुवात झाली आहे. स्थानिक शिवसेना नेते चंद्रशेखर सोमण यांनी सातत्याने पाठपुरावा करून हा विषय महापालिका आयुक्तांच्या निदर्शनास आणला होता. ११ ऑगस्ट रोजी दिलेल्या निवेदनात पिण्याचे पाणी, आसन व्यवस्था, प्रकाशयोजना, शववाहिनी यासारख्या मूलभूत सुविधांचा अभाव अधोरेखित केला होता. त्यानंतर २५ सप्टेंबर रोजी पुनश्च स्मरणपत्र देत तातडीची कारवाईची मागणी करण्यात आली. यानंतर महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांनी तात्काळ कार्यवाही करत स्मशानभूमीत स्वच्छता मोहीम सुरू केली. यावेळी सर्व प्रमुख स्मशानभूमीची महिन्यातून दोनदा स्वच्छता करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. तसेच, २४ तास सुरक्षारक्षक व इतर पायाभूत सुविधा उपलब्ध करण्याचे आदेशही आयुक्तांनी दिले आहेत.

### कर्जत शहरात दुर्गामाता दौड उत्साहात

**कर्जत** : नवरात्र उत्सवाच्या निमित्ताने कर्जत शहरात दुर्गामाता दौडचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी भगव्या झेंड्यांनी आणि घोषणांनी शहर दुमदुमून गेले. जय दुर्गा माता, छत्रपती शिवाजी महाराज की जय, अशा गर्जनांनी वातावरणात धर्म, शौर्य आणि हिंदू एकतेचा उत्साह भरला होता. मुसळधार पावसात, ओल्या रस्त्यावरून जोशात धावणाऱ्या तरुणांच्या पावलांतून धर्मनिष्ठा आणि पराक्रमाची झलक दिसून आली. हा उत्साह पाहून उपस्थित नागरिक भारावून गेले. यावेळीच्या दुर्गामाता दौडीत महिला धारकरीही सहभागी झाल्या होत्या. आदिशक्तीची आराधना करणाऱ्या या उत्सवात स्त्रीशक्तीचा सहभाग हेच खरे नवरात्राचे सार असल्याचे आयोजकांनी नमूद केले. कार्यक्रम सुरळीत पार पाडण्यासाठी पोलीस प्रशासनाने उत्तम बंदोबस्त ठेवला. शिस्तबद्धपणे दौड पूर्ण झाल्याने उपस्थित नागरिकांनी प्रशासनासोबत आयोजकांचेही कौतुक करण्यात आले.

## निवडक



### आरोग्य तपासणीला प्रतिसाद

**रोहा :** जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशीकांत पाटील यांच्या मागर्दर्शनाखाली व वैद्यकीय अधिक्षक डॉ. सचिन गोमसाळे यांच्या नियोजनद्वारे रोहा उपजिल्हा रुग्णालय येथे स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियान अंतर्गत, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्या सूचनेनुसार दिव्यांग बालकांची तपासणी दिव्यांग प्रमाणपत्र वितरण व नुतनीकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. संजय गुडे, डॉ. आशिष मेंश्राम, डॉ. अर्चना सिंग, डॉ. पवन महाजन, डॉ. मृणालिनी कदम, डॉ. श्रीकांत पूरी, डॉ. अभिजीत कोकणे, डॉ. विश्वनाथ देशमुख, प्रतिभा फड़तरे, विशाल दामोदरे, विशाल भादुर्गे, राजेश पवार, प्रफुल्ला कांबळे, सुप्रिया पाटील, श्रद्धा कुदले यांनी रुग्णतपासणी करुन औषधोपचार केले. कार्यक्रम नियोजन सुमन गोवंडे, पूर्वी वाणी, नंदिनी सुरवसे, मंगल टेमकर, दीपाली गायकवाड़, स्नेहल चादोरकर, संध्या बेलोस्कर, मोहिते, नाजुका चेऊलकर, महेश गोसावी, योगेश शिंदे, अंकिता शिंगाड़े यानी केले. कार्यकमाचे प्रास्ताविक डॉ. सचिन गोमसाळे, सूत्रसंचासलन डॉ. सलमा मुकादम व आभारप्रदर्शन डॉ. नचिकेत पाटील यांनी केले.



### कृषी अधिकाऱ्यांचा शेतभेट दौरा

**तळा :** तळा तालुक्यात उपविभागीय कृषी अधिकारी माणगाव शुभम बोराडे, तालुका कृषी अधिकारी तळा कांबळे साहेब व मंडळ कृषी अधिकारी तळा घालमे यांनी तालुक्यातील विविध गावांना भेट देऊन शेतकऱ्यांच्या प्रात्यक्षिकांची पाहणी केली. मौजे खांबिवली येथे डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत स्थापन झालेल्या जय हनुमान सेंद्रिय शेतकरी उत्पादक गटात भेट देऊन गटातील शेतकऱ्यांनी तयार केलेल्या सेंद्रिय निविष्ठांची तसेच सेंद्रिय निविष्ठांचा वापर केलेल्या पिकांची प्रात्यक्षिके पाहिली.यानंतर मौजे रोवळा येथे महिला बचत गटाने उभारलेल्या नाचणी पीक प्रात्यक्षिकास भेट देऊन शेतकऱ्यांना नाचणी पिकाविषयी मार्गदर्शन केले. तसेच विठोबा घाडगे यांनी राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण तृणधान्य उप अभियान अंतर्गत घेतलेल्या सलग तुर पिकाची पाहणी करण्यात आली. मौजे ताम्हाणेतर्फे तळे येथे विलास धाडवे यांनी राष्ट्रीय अन्नसुरक्षा व पोषण तृणधान्य अभियानांतर्गत चार सूत्री पद्धतीने घेतलेल्या भात लागवड प्रात्यक्षिकास भेट देऊन कृषी अधिकाऱ्यांनी मार्गदर्शन केले. यावेळी आत्मा अंतर्गत भात पीक प्रात्यक्षिकांचीही पाहणी करण्यात आली.



### पाककला स्पर्धांचे आयोजन

**अलिबाग :** आजच्या युगात फास्ट फूडचे प्रमाण वाढत असून मुलांच्या शरीरावर त्याचा विपरीत परिणाम होत आहे. यादृष्टीने पौष्टिक पदार्थांचे महत्त्व समजण्यासाठी पाककला स्पर्धांचे आयोजन राजिप शाळा साखर येथे करण्यात आले होते. स्पर्धेमध्ये २१ महिलांनी सहभाग घेऊन अनेक पौष्टिक पदार्थांची मांडणी केली होती. गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी व केंद्र प्रमुख प्राची ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पाककला स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेसाठी प्रमुख पाहुणे तसेच परिक्षक म्हणून आक्षी ग्रामपंचायत सरपंच रश्मी पाटील व निरजा नाईक उपस्थित होत्या. याप्रसंगी रेश्मा भुकवार, अंकिता भुकवार, भावना जगू, रेश्मा तांडेल, करिश्मा भुकवार, नुतन तांडेल, सुवर्णा बुरांडे सुनिता गोतकर, मनिषा गुरव, राजश्री गण,चंदना निर्गूले, सुचिता मुंढे, रंजिता सारंग,अमोली साटविलकर, मनिषा तांडेल व इतर महिला पालक उपस्थित होते. स्पर्धेत प्रथम क्रमांक अर्पणा नर, द्वितीय क्रमांक अंकिता भुकवार, तृतीय क्रमांक रेश्मा भुकवार, चतुर्थ क्रमांक सुवर्णा बुरांडे आणि पाचवा क्रमांक अमोली साटविलकर यांनी पटकावला. सर्व विजेत्यांना भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. सदर स्पर्धांचे नियोजन मुख्याध्यापक राजेंद्र पाटील, स्मिता चिखले यांनी नियोजन केले होते.

# सततच्या पावसामुळे भातशेतीचे नुकसान



**। रोहा । प्रतिनिधी ।**

बिघडत चाललेल्या निसर्गचक्राचा सर्वाधिक मोठा फटका शेती क्षेत्राला आणि बळीराजाला बसला आहे. या वर्षी रोहा तालुक्यात रब्बी हंगामात मोसमी पावसाने मे महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात अवेळी हजेरी लावल्याने शेती क्षेत्राचे कधीही भरून न येणारे फार मोठे नुकसान झाले आहे. आणि आता हातातोंडाशी आलेले पीक वाढत चाललेल्या पावसाने निसटून जाण्याची भीती शेतकरी वर्गा समोर उभी ठाकली आहे.

मे च्या पहिल्या आठवड्यात पावसाने केलेली सुरूवात आता थांबायचे नावच घेत नाही. संपूर्ण मे महिन्यात पाऊस अधून-मधून बरसतच राहिल्याने भातशेतीमध्ये भरपूर पाणी तुंबले होते. उभी भातशेती आडवी झाल्याने व शेती कापण्या लायकच राहिली नसल्याने शेतकरी अक्षरक्ष: देशोधडीला लागला. अशा कठिण काळात शेतकरी वर्गाने स्वतःला सावरून घेतले. खरीप हंगामाचे भातशेतीच्या कामासाठी सज्ज झाला. सुरूवातीला बियाणे लागवडीयोग पाऊस पडल्याने शेतकरी समाधानी झाला व भाताची तयार रोपेही योग्य वेळेतच लागवडीखाली आणली. लागवडीची कामे शंभर टक्के यशस्वीरित्या पार पाडली नाही तोच पुन्हा पावसाने आपले रंग दाखवायला सुरुवात केली. जुलै महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात पावसाने पुन्हा जोरदारपणे बरसायला सुरूवात केल्याने जुलै महिन्यात दोन तीन वेळा पुर परिस्थिती निर्माण झाल्याने भातशेती अक्षरशः आठ-आठ दिवस पाण्याखाली साचून राहिली होती. तिच परिस्थिती ऑगस्ट महिन्यात आणि आता चालू सप्टेंबर महिन्यात भातशेतीने फुल धरुन पिकायला सुरूवात केली असल्याने व हलवी भाताची कणसे तयार होण्याच्या मार्गावर असताना पुन्हा सक्रिय झालेला पाऊस शेती क्षेत्राचे फारच मोठे नुकसान करू लागला आहे. त्यात आणखी भर म्हणजे भात पिकांवरती ठिकठिकाणी पडत असलेल्या करपा रोगानेही शेतकरी हवालदिल झाला आहे. अगोदरच शेती परवडत नसताना व महागाईने उच्चांक गाठला असतानाच काढ-ओढ करून शेती पिकविली जात आहे. परंतू चालू हंगामात सततच्या पावसाच्या खेळामुळे शेतीचे पुरते नुकसान झाले आहे.

**लागवडीचे क्षेत्रात घट**

**रोहा तालुक्यातील शेतकरी वर्ग पुरता बेजार झाला असल्याने शेती लागवडीचे क्षेत्रही दहा हजारावरून सात हजार तीनशे एवढ्यावर आल्याने उत्पादन क्षेत्रही घटू लागले आहे.**

> **शेती क्षेत्रावर वारवार येत असलेल्या संकटांमुळे उत्पादनाचे क्षेत्र कमी झाले आहे. या वर्षाच्या पावसाळी हंगामात पावसाने मोठाच उच्चांक गाठल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. अशा परिस्थितीत शेतकरी वर्गाच्या होणाऱ्या नुकसानीबाबत दोन तीन वेळा पंचनामेही करण्यात आले आहेत. शेतीकडे तरूण वर्गाने अधिक लक्ष द्यावे यासाठी शासन स्तरावरूनही चांगल्या पद्धतीने प्रबोधनाचे काम सुरू आहे.**
>
> **-महादेव करे, तालुका कृषी अधिकारी, रोहा**

# कर्जतमध्ये मिळाला पहिला कुणबी दाखला

**प्रांत अधिकारी कार्यालयाने नोंदी तपासल्या, सकल मराठा समाजाकडून स्वागत**



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

मराठा समाजाला कुणबी म्हणून आरक्षण मिळावे या मागणीसाठी सुरु झालेल्या मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाची झळ महाराष्ट्रभर पोहोचली आहे. राज्यातील विविध भागांत आता ओबीसी अर्थात कुणबी दाखले मिळण्यास सुरुवात झाली आहे. याच पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील पोटल गावातील रहिवासी विलास श्रीखंडे हे कर्जत तालुक्यातील पहिले मराठा कुणबी दाखला मिळविणारे ओबीसी जात प्रमाणपत्र मिळविणारे ठरले आहेत.

पोटल गावातील श्रीखंडे यांनी आपल्या भागातील जिल्हा परिषद शाळेच्या जुन्या नोंदींचा सखोल अभ्यास करून त्या शासकीय पातळीवर दाखला मिळावा यासाठी अर्ज कर्जत तहसील कार्यालयात केला. कर्जत प्रांत अधिकारी कार्यालयाने त्या नोंदी तपासून अर्जदार श्रीखंडे यांना ओबीसी दाखला मंजूर केला. हा दाखला सेतू मधून प्राप्त करून घेतल्यानंतर सकल मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत श्रीखंडे यांना हा दाखल स्वीकारला.याबाबतमराठासमन्वयक उदय पाटील यांनी तालुक्यात जुन्या कुणबी नोंदी शोधण्यासाठी संशोधन सुरू केले आहे. श्रीखंडे यांनी केलेले प्रयत्न प्रेरणादायी आहेत. यावेळी शंकर थोरवे, उदय पाटील, राजेश लाड, सुरेश बोराडे, उमेश म्हसे, शरद बडेकर, रत्नाकर बडेकर, मनोज लाड, कैलास म्हामले, नितीन बडेकर, सुभाष पालकर, मनोज बोडके, महेश श्रीखंडे, हरेश तुपे आदी उपस्थित होते.

**जुन्या नोंदींचा शोध घेण्याचे आवाहन**

**तालुक्यातील इतर नागरिकांनीही आपल्या परिसरातील जिल्हा परिषद शाळा, महसूल प्रशासन याठिकाणी उपलब्ध जुन्या नोंदींचा शोध घ्यावा आणि शासनाकडे पाठपुरावा करून आपापले कुणबी दाखले मिळवावेत असे आवाहन केले.**

## चिल्हे शाळेत शारदोत्सव साजरा



**। कोलाड । प्रतिनिधी ।**

राजिप प्राथमिक शाळा चिल्हे येथे सोमवारी (दि.२९) सप्टेंबर रोजी शारदोत्सवानिमित्त फॅन्सी ड्रेस कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध वेशभूषा परिधान करून उपस्थित शिक्षक, शालेय शिक्षण व्यवस्थापन समितीची मने जिंकली.

शाळेतील इयत्ता पहिली ते चौथी पर्यंतच्या विद्यार्थी चिमुकल्यांनी शारदोत्सव म्हणून वेगवेगळ्या फॅन्सीने प्रांगण रंगून गेले होते.

वेशभूषा नृत्यकला कार्यक्रमात प्रत्येक वर्गातून गटवारी केली होती. त्यात मोठ्या गटात प्रथम क्रमांक पौर्णिमा कल्पेश लोखंडे, द्वितीय क्रमांक अधिरा अमित महाडिक, तृतीय क्रमांक आराध्य अमित महाडिक, उत्तेजनार्थ अथर्व महेंद्र महाडिक, तसेच लहान गटातून प्रथम क्रमांक ओवी नरेंद्र महाडिक, द्वितीय क्रमांक स्वरा हरिश्चंद्र लोखंडे, तृतीय क्रमांक आर्णा राम महाडिक, यांचे तसेच सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक कार्यक्रमातून सन्मानित करण्यात आले होते.

## भोंडाईतून जोपासली जाते आदिवासी संस्कृती

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नवरात्र उत्सव काळात घरोघरी, गावोगावी आणि बाजारात जाऊन आपली आदिवासी संस्कृतीचे माध्यमातून भोंडला आणि भोंडाई गीते सादर केली जात आहेत. भोंडाई गीते सादर करून आपली संस्कृती जपतानाच समाजाला आनंद देण्याचे काम आदिवासी महिला करीत आहेत.

डोक्यावर पाण्याने भरलेला कलश आणि त्यात फुले सोबत टिपऱ्यांच्या तालावर ठेका घेत म्हटली जाणारी गाणी हि आदिवासी संस्कृती नवीन पिढी समोर सादर करायला आदिवासी महिला दररोज घरातून बाहेर पडतात.

सध्याच्या आधुनिक युगात घटस्थापनेच्या नऊ दिवसात गरबा नृत्य केले जाते. परंतु आजही आदिवासी पड्यांमध्ये भोंडाई गीतांच्या माध्यमातून आदिवासी संस्कृती जोपसली जात आहे. रायगड जिल्हातील बहुतांश भागात आदिवासी बांधव राहत असून प्रत्येक सण उत्सव परंपरेत वेगळेपणा पाहावयास मिळतो. त्यातून संस्कृती टिकवण्याचा प्रयत्न केला जात आहे.



नवरात्रीमध्ये आदिवासी महिला या भोंडई नऊ दिवसात गावागावात गाणं, नृत्य करण्यास दाखल होतात. या मध्ये लहान मुलींपासून वयस्कर महिलासुद्धा मोठया संख्येने सहभागी होतात. त्यांच्या हातात दोन टिपऱ्या आणी केसात रानफुलं लावलेली असतात.त्यात एकीच्या डोक्यावर अठरा धान्य एकत्र करून बांधलेलं गाठोडं असतं त्याला भाताच्या, वरी, नाचणीच्या लोंब्या लावल्या जातात.

प्रत्येकाच्या घरासमोर भोंडाईची गाणी गात नृत्य सादर करून नाचणी, तांदूळ किंवा पैशांच्या स्वरूपात बिदागी दिली जाते. काळात असे नृत्यू आणि सजून आलेल्या आदिवासी महिला यांच्यामुळे सर्वंतर दिसून येत आहे.

अनेकदा भोंडाईच्या नृत्यात प्रामुख्याने टोपल्याखाली एखादी वस्तू झाकून ठेवली जाते व ती वस्तू कोणती आहे ते ओळखायची असते, आणी ती अचूक ओळखली जाते. वस्तू ओळखल्या नंतर ती वस्तू त्यांना भेट स्वरूपात दिली जाते. नऊ दिवस गावागावांत भोंडाई गाणी गात मिळालेल्या धान्यातून नवव्या दिवशी भोंडाई मातेला नैवेधे दिला जातो. अशाप्रकारे आदिवासी भागात आपली परंपरा संस्कृती जपली जात असून अशा संस्कृतीचे कौतुक सर्व समाजातून होत आहे.

## शनिवारी पनवेलमध्ये वर्धापन दिन

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

भारतीय बौध्द महासभा जिल्हा शाखा (उत्तर) यांच्या विद्यमाने प्रथम वर्धापन दिन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. रायगड जिल्ह्यातील नवीन पनवेल येथील भीमप्रेरणा सांस्कृतिक केंद्र येथे शनिवारी (दि.४) दुपारी एक वाजण्याच्या सुमारास हा सोहळा जिल्हाध्यक्ष सुशील वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली साजरा केला जाणार आहे.

■ **मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे सुशील वाघमारे यांचे आवाहन**

यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून राष्ट्रीय उपाध्यक्ष तथा केंद्रीय कार्यालय प्रमुख एस. के. भंडारे, राष्ट्रीय सचिव बी. एच गायकवाड, राष्ट्रीय उपाध्यक्ष तथा केंद्रीय महिला विभाग प्रमुख सुषमा पवार, राष्ट्रीय सचिव तथा महाराष्ट्र राज्य प्रभारी भिकाजी कांबळे, महाराष्ट्र राज्य अध्यक्ष यु. जी. बोराडे, महिला कमिटी महाराष्ट्र राज्य अध्यक्ष स्वाती शिंदे, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा नेते दिपक मोरे, सम्यक विद्यार्थी आंदोलन महाराष्ट्र राज्याचे उपाध्यक्ष ॲड. कैलास मोरे, जयवंत लव्हाडे, दिपक गायकवाड, उषा कांबळे, आनंद गायकवाड, ॲड. हेमंत शिंदे आदी मान्यवरांसह जिल्ह्यातील पदाधिकारी उपस्थित राहणार आहे. रायगड जिल्ह्यातील रायगड महिला व पुरुष कार्यकारिणी, शहरी ग्रामीण भागातील तालुका, विभाग, ग्राम, वार्ड शाखेतील पदाधिकारी, केंद्रीय शिक्षक, शिक्षिका, बौध्दाचार्य, माजी श्रामणेर, समता सैनिक दलाचे पदाधिकारी, जवान, उपासक उपासिका सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहवे असे आवाहन जिल्हा शाखा अध्यक्ष सुशील वाघमारे यांनी केले.



● सार्वजनिक नवरात्र उत्सव मंडळ भाकरवड यांनी बनवलेली मातेची मुर्ती. (छायाचित्र : महेंद्र म्हात्रे)



● महिला व बालकल्याण विभाग रायगड जिल्हा परिषद.



● लावण्या धुमाळ, पेझारी.



● पूजा शिपाई, पेझारी.



●सोनाली दांडेकर, पेझारी.



● चिरनेर-साईनगर, नवरात्र उत्सव.



● आई कृष्णादेवी महिला मंडळ, चौलमळा.



● जिल्हा विधी सेवा प्राधिकरण रायगड-अलिबाग.



● जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा अलिबाग-रायगड.



● जय भवानी सांस्कृतिक क्रीडा मंडळ मुशेत



● उलवे येथील नवरात्र उत्सव मंडळातील महिलांनी केला रंगोत्सव.

दिनांक : ३० सप्टेंबर २०२५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत या त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकतीसंदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, बयानापावती, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतींच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे जिते, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकती:-**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ. मीटर | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| लाभुराम राणाराम देवासी | ८९ | १/इ | ०-४७-०० | ० | ४१ |
| | ८९ | १०/क | ०-११-१० | ० | ११ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे. सही / -

कार्यालयीन पत्ता :-२०३ व २०४, दुसरा मजला, साईधाम अपार्टमेंट, हुतात्मा हिराजी पाटील चौक (अंबिका नाका), पो.नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड.

**ॲड.अल्पेश अनंत कराळे**
(ॲडव्होकेट)
दिनांक:-३०/०९/२०२५
मो. नं. ९९२२३६८१२१

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



**मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.**

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

दिनांक : ०२ ऑक्टोंबर २०२५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकती या त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकतीसंदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, बयानापावती, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतींच्या मालकांबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे बीडखुर्द, ता. खालापुर, जि. रायगड येथील जमीन मिळकती :-**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ. मीटर | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| वंश मोहन गुरनानी | २० | १/अ/१ | ४-८३-०० | १ | ९७ |
| प्रिती गुरनानी | २३ | १० | ०-१२-०० | ० | २० |
| प्रिती गुरनानी | २३ | १३ | ०-११-०० | ० | ३० |
| **उंबरविरा, ता. खालापुर, जि. रायगड येथील जमीन मिळकत :-** | | | | | |
| मोहन गुरनानी | १८ | ७/ब | ०-०८-६० | ० | ०५ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे. सही / -

कार्यालयीन पत्ता :-२०३ व २०४, दुसरा मजला, साईधाम अपार्टमेंट, हुतात्मा हिराजी पाटील चौक (अंबिका नाका), पो.नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड.

**ॲड.अल्पेश अनंत कराळे**
(ॲडव्होकेट)
दिनांक:-०२/१०/२०२५
मो. नं. ९९२२३६८१२१

दिनांक : ०१ ऑक्टोबर २०२५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांत कळवावे. मुदती मध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे धामणी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे-आर-पॉ | आकार रु. - पै. |
|---|---|---|---|---|
| मधुसूधनन नायर | ७६ | १ | २-६७-०० | २ - ०५ |
| सुजाता मधुसूधनन नायर | यापैकी लिहून देणार यांच्या मालकीचे विक्री केलेले क्षेत्र हे ० आर ४१ पॉ ०० मात्र | | | |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे. सही / -

कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे, कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
मो.नं.९१५८२७७७२८
दिनांक :- ०१/१०/२०२५

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या खुलास्याद्वारे कळविण्यात येते की मी दिनांक १० सप्टेंबर २०२५ रोजीच्या कृषीवल या वृत्तपत्रामध्ये पान नं. २ वर १) जयश्री शक्ती नाईक २) शक्ती ब्रह्मा नाईक यांचे नावे असलेल्या खालील नमुद मिळकतीची जाहिर नोटीस प्रसिद्ध केली होती. जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मौजे पोटल, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर. पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ३८ | २ | ०-३४-०० पैकी वरील नमूद मालक यांचे मालकीचे क्षेत्र ०-१६-०० | २-७२ |

वर नमुद सर्व्हे नंबर व मिळकत मालक यांचे नावाची वरील मिळकत आमचे अशिल खरेदी घेणार आहेत याबाबतची जाहिर नोटीस मी प्रसिद्ध केली होती. सदरील मिळकतीबाबत आमचे अशिल व जमीन मालक यांचेमध्ये आपापसात बोलणी झाली असून काही तांत्रिक अडचणीमुळे त्यांनी सदरील मिळकतीचा व्यवहार रद्द केलेला आहे. त्यामुळे दिनांक १० सप्टेंबर २०२५ रोजीची वरील मिळकत खरेदी करणेकरीता प्रसिद्ध झालेली नोटीस या नोटीसीद्वारे रद्द करीत आहोत.

कर्जत
ता. ०२/१०/२०२५

**ॲड. किशोर तुकाराम देशमुख**
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो.९४२२०६८७५५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील हे खालील वर्णनाची मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक श्री. विक्रम प्रभाकर म्हात्रे, रा. शिळफाटा, ठाणे यांचे कडून कायम खरेदी करणार असून तशी बोलणी आमचे अशिल व मिळकतीचे मालक यांचेमध्ये सुरु आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे तिवरे, तालुका- सुधागड, जिल्हा - रायगड**

| सर्व्हे नं./हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|
| २२/५ | ०-२२-३० | ४.४१ |

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीच्या मालकांनी आमचे अशिलांस दिली असून, मिळकतीचे मालक आमचे अशिलांचे लाभांत खरेदीखत करून देणार आहेत. तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक : ०२/१०/२०२५

सही/-
**ॲड. नोएल सॅमसन चिंचोलकर**
मु.पो. पाली. एकतापथ,
ता. सुधागड, जि. रायगड, ४१०२०५
मो.नं. ९२७१९२३९०३

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरिता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे धोत्रे, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ३/७ | एकूण क्षेत्र ०-५८-०० हे.आर. | ०.४२ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

सही/-
दिनांक :- ०२/१०/२०२५
ठिकाण :- पनवेल

**ॲड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- शॉप नं.२३, प्लॉट नं. ५१, कल्पतरु कॉम्प्लेक्स,
सेक्टर ०९ खांदा कॉलनी, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
४१०२०६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरिता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे धोत्रे, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| १६/१ | एकूण क्षेत्र ०-१८-०० हे.आर. | ०.१२ |
| ६१/२ | एकूण क्षेत्र २-००-०० हे.आर. १) यापैकी मालती गजानन रसाळ याचे मालकीचे खाते क्र.२५० ज्याचे क्षेत्र ०-६०-०० हे.आर २) या पैकी वंदना भास्कर रसाळ याचे मालकीचे खाते क्र. ३२९ ज्याचे क्षेत्र ०-३४-०० हे.आर ३) यापैकी अमोल महादेव सूर्यवंशी याचे मालकीचे खाते क्र. ३९७ ज्याचे क्षेत्र ०-४०-०० हे.आर | १.३८ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक :- ०२/१०/२०२५
ठिकाण :- पनवेल

सही/-
**ॲड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- शॉप नं.२३, प्लॉट नं. ५१, कल्पतरु कॉम्प्लेक्स,
सेक्टर ०९ खांदा कॉलनी, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६

## तहसिल कार्यालय सुधागड यांचे न्यायालयात

क्र. फौजदारी/कात-९/आवक क्र.६०६/२०२५

श्री. दिलीप दत्तात्रेय देशमुख
मु. आवंढे पो. खांडपोली — वादी
ता. सुधागड, जि. रायगड

विरुद्ध

ग्रामपंचायत अधिकारी - ग्रामपंचायत वाघोशी — प्रतिवादी
ता. सुधागड, जि. रायगड

**जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३ (३) प्रमाणे जन्म-मृत्युबाबत**

तमाम जनतेस या जाहिर नोटीसद्वारे कळविणेत येते की, श्री दिलीप दत्तात्रेय देशमुख मु. आवंढे पो खांडपोली ता. सुधागड, जि. रायगड यांनी त्यांची पत्नी कै. संगिता दिलीप देशमुख हिचा मृत्यु दि. १०/०३/१९९२ रोजी मौजे - आवंढे ता. सुधागड, जि. रायगड येथे झाला आहे. परंतु तिची नोंद अद्यापपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात केली नाही असे प्रतिज्ञापत्रात नमुद करुन तिच्या मृत्यु नोंदीचा आदेश मिळणेबाबत अर्ज तहसिल कार्यालय सुधागड येथे सादर केला आहे.

सदर संगिता दिलीप देशमुख तिच्या मृत्यु नोंदीच्या तारखेबाबत कोणाची हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत तहसिल कार्यालय, सुधागड पाली येथे स्वतः अथवा आपल्या प्रतिनिधीमार्फत लेखी स्वरुपात हरकत दाखल करावी. जर सदर मुदतीत हरकत न आल्यास अर्जदार यांनी सादर केलेल्या पुराव्याच्या आधारे मृत्यु नोंद करण्याचे आदेश पारीत करणेत येईल. असे या जाहीर नोटीसद्वारे प्रसिद्ध करणेत येत आहे.

ठिकाण :- सुधागड पाली
दिनांक :-२४/९/२०२५

सही/-
(उत्तम कुंभार तहसिलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी सुधागड

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे मांडला, ता. मुरुड, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या भातशेती मिळकतीचे विद्यमान मालक सौ. पुनम दामोदर नागोठकर रा. फणसाड रोड, मारुती आळी, मांडला, ता. मुरुड, जि. रायगड यांच्या नांवे असलेली भातशेती मिळकत माझे अशिलांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्र. व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| मांडला ता. अलिबाग | ८७ | ०-४५-०० पो.ख. ०-०४-८० एकूण ०-४९-८० | ११.३१ |

सबब सदरहू भातशेती मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. सबब सदर मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठे करार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहेत असे गृहीत धरुन माझे अशील वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : ०१/१०/२०२५

सही/-
**ॲड. धिरज जयवंत म्हात्रे**
दुय्यम निबंधक कार्यालयासमोर, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड.

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक यांचा अविभाज्य हिस्सा विकत घेण्याचे ठरविले आहे व तशी बोलणी केलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | ग.नं. | क्षेत्र हे. आर. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| मापगाव अलिबाग | ३५ | ०.३१.१० पो.ख. ०.०१.०० एकुण ०.३२.१० | ८.१२ |

वर वर्णन केलेली मिळकत हे या जाहिर नोटीसचा विषय आहे.

सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असल्याचा दावा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांना केलेला आहे. तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कोणाचाही कसलाही हक्क हितसंबंध बोजा, अथवा, गहाण, दान, लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी मेन्टेनस, मेहेर, कर्ज वगैरे बाबत कसलाही हक्क व हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकतीसंबंधाचा लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांचे आत आणून द्यावी. सदर मुदतीत हरकत न आल्यास सदरचा व्यवहार आमचे अशिल पूर्ण करतील व मागून येणारी हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही यांची नोंद घ्यावी. मागाहुन येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही हे सर्वांना कळावे.

सही/-
**ॲड. कांचन प्रशांत नार्वेकर**
ॲकॉन क्लासिक फ्लॅट नं.१०६
जिल्हा न्यायालय रायगड समोर
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.९८५०७५०८३४

दिनांक : २९/०९/२०२५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस जाहीर नोटीसीने कळविण्यात येते, की

आमचे अशिल खालीलप्रमाणे वर्णन केलेली मिळकत विकत घेण्याच्या विचारात आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे-गाणी, तालुका-श्रीवर्धन, जिल्हा-रायगड**

| क्र. | भोगवटादाराचे नाव | सर्व्हे नं | क्षेत्र |
|---|---|---|---|
| १ | श्री.पंकज ललीत जैन | १६८/० | १-००-० |
| | | १७५/० | १-४३-७ |
| | | १८१/० | ०-५६-९ |
| | | एकूण | |
| २ | श्री.नरेंद्र अमिचंद जैन | १५६/० | ०-९८-० |
| | | १५७/० | १-००-२ |
| | | १६१/० | ०-५८-० |
| | | १७०/० | ०-०६-० |
| | | १७१/० | ०-०७-१ |
| | | १७२/० | ०-१०-१ |
| | | एकूण | २-७९-४ |
| ३ | श्री.मुकेश नरोत्तम तन्ना | १६० | ०-८७-० |
| | | १६२ | १-०३-० |
| | | १६३ | ०-९९-० |
| | | १६६ | ०-८०-६ |
| | | १६७ | ०-७९-० |
| | | १७४ | ०-८७-० |
| | | १७६ | ०-४९-८ |
| | | १७७ | ०-०१-० |
| | | १९७ | १-०६-० |
| | | एकूण | |
| ४ | श्री.प्रशांत गजानन कुलकर्णी | १६५ | ०-५५-१ |
| | | १८० | १-१७-६ |
| | | १९८ | ०-८१-० |
| | | एकूण | २-५३-७ |
| ५ | श्री.फारूक इस्माईल पटेल | १९० | ०-१६-० |
| | | एकूण | ०-१६-० |
| ६ | श्री.किशोर भुरमल जैन | १६४ | ०-३२-४ |
| | | एकूण | ०-३२-४ |

वर वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे जमिन मालकांनी आमच्या अशिलांना विकण्याचे मान्य कबुल केले आहे. व आमचे अशिलांनी सदर मिळकत विकत घेण्यासाठी मिळकतीचा मालकाबरोबर करार केलेला आहे.

तरी सदर मिळकतीसंबंधी कोणत्याही व्यक्तींच्या अथवा कोणतेही संस्थेचा गहाण, दान, बक्षीस, खरेदी साठेकरार, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा, हक्क भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा कोणताही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास त्यांच्या लेखी हरकती आणि त्यांच्या हरकतीत नमुद केलेल्या हक्कांबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांसकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसाच्या मुदतीत प्रत्यक्ष येऊन अथवा रजि.पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकत न असल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहेत असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाही. हे कळावे.

सही/-
**श्री. अरविंद चामले**
ॲडव्होकेट व नोटरी, भारत सरकार
ऑफिस-११, स्नेह सदन,
गडकरी पथ, पनवेल, जि.रायगड
फोन नं.-२७४५६१७८
मो.९८६९५५१७८५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची बिनशेती प्लॉट तिचे मालक शिवाजी अनंता मोरे यांचेकडुन खरेदी करण्याचे ठरविले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे

**मौजे. किरवली तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील बिनशेती प्लॉट**

| मालकाचे नाव | भूमापन क्रं व उपविभाग/ सर्व्हे नं/हिस्सा नं | क्षेत्र (चौ.मी.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| शिवाजी अनंता मोरे | ६७/५/३ | ४४० | ४४-०० |

या मिळकतींशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही हितसंबंध, बयाणापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि तसेच त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतील जाणार नाही.

ता. ०२/१०/२०२५

खरेदीदारातर्फे वकील
**ॲड. निलेश कान्हू मोरे मोबा. ९८२२६९११०९**
**ॲड. वृषाली रघुनाथ मोरे मोबा.८५३०१४६८५४**
ऑफिस पत्ता - शॉप नं २९ तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर अमराई रोड.
कर्जत ता कर्जत, जि. रायगड ४१०२०१

दिनांक : २९/०९/२०२५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस जाहीर नोटीसीने कळविण्यात येते, की

आमचे अशिल खालीलप्रमाणे वर्णन केलेली मिळकत विकत घेण्याच्या विचारात आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे-जावेळे, तालुका-श्रीवर्धन, जिल्हा-रायगड**

| क्र. | भोगवटादाराचे नाव | सर्व्हे नं | क्षेत्र |
|---|---|---|---|
| १ | राजेंद्र फुटरमलजी जैन, प्रविणप्रकाश दिलीप जैन | १७६ | ०-६२-० |
| | | १९५ | ०-५९-८ |
| | | २१३ | ०-४८-० |
| | | २२६ | ०-२४-७ |
| | | २२९ | ०-१०-९ |
| | | एकूण | |
| २ | किशोर भुरमल जैन | १८९ | ०-५२-० |
| | | एकूण | ०-५२-० |
| ३ | श्री.राजेश मुकुंद मेहता, प्रविणप्रकाश दिलीप जैन | २०३ | २-८३-० |
| | | एकूण | २-८३-० |
| ४ | श्री.गजानन सदानंद हावरे | १८२ | १-१३-० |
| | | १८३ | ०-९१-० |
| | | एकूण | |
| ५ | विमल भुरमल जैन | १३० | |
| | | एकूण | ०-९४-५ |
| ६ | मुकेश नरोत्तम तन्ना | १४२ | ०-५९-० |
| | | एकूण | ०-५९-० |
| ७ | सरस्वती रामचंद्र मळेकर, रमेश रामचंद्र मळेकर, शुभांगी सुरेश उजळ | १६८ | ०-७५-० |
| | | एकूण | ०-७५-० |
| ८ | विजय हिम्मतलाल जैन, राजेंद्र गणेशमल जैन, प्रविणप्रकाश दिलीप जैन, रिटा राजेंद्र जैन, आकाश राजेंद्र जैन, प्रियांका राजेंद्र जैन | १५५ | ०-४०-० |
| | | एकूण | ०-४०-० |
| ९ | विजय हिम्मतलाल जैन, किशोर भुरमल जैन, रिटा राजेंद्र जैन, प्रियंका राजेंद्र जैन | १३९ | ०-३३-३ |
| | | १४७ | ०-८५-० |
| | | २०७ | १-१५-० |
| | | एकूण | |
| १० | दिलीप बाळु साठे, राजेंद्र फुटरमलजी जैन, प्रविणप्रकाश दिलीप जैन | १३२ | ०-२१-७० |
| | | १३४ | ०-०७-५० |
| | | १६१ | १-४२-०० |
| | | १७९ | १-३५-०० |
| | | १९४ | ०-४५-९० |
| | | १९६ | ०-२५-५० |
| | | १९८ | १-२२-०० |
| | | २०० | ०-०२-०० |
| | | २११ | ०-३४-०० |
| | | २१६ | ०-३१-०० |
| | | २२३ | ०-२७-८० |
| | | २३४ | ०-१८-९० |
| | | एकूण | |
| ११ | किशोर भुरमल जैन, विजय हिम्मतलाल जैन | १४५ | ०-४५-८ |
| | | १४९ | ०-०५-० |
| | | २०१अ | ३-३३-० |
| | | २०१ब | १-५१-० |
| | | एकूण | |
| १२ | दिलीप बाळु साठे, राजेंद्र फुटरमलजी जैन | १९२ | ०-२४-६० |
| | | १९३ | ०-२०-३० |
| | | १९७ | ०-१८-५० |
| | | १९९ | ०-१७-९० |
| | | २०९ | १-१०-०० |
| | | एकूण | |
| १३ | विजय हिंमतलाल जैन, किशोर भुरमल जैन, मुकेश कांतीलाल जैन, रिटा राजेंद्र जैन, आकाश राजेंद्र जैन, प्रियांका राजेंद्र जैन | १५४ | ०-५१-० |
| | | १६७ | ०-३५-० |
| | | २१२ | ०-५३-० |
| | | २१४ | ०-४७-० |
| | | २१८ | ०-३९-५ |
| | | २२० | ०-०६-३ |
| | | २२४ | ०-१८-४ |
| | | २२५ | ०-०६-८ |
| | | २२८ | ०-२१-९ |
| | | २३१ | ०-०८-३ |
| | | २३२ | ०-०२-८ |
| | | २३३ | ०-०९-० |
| | | २४५ | ०-१०-० |
| | | एकूण | |
| १४ | विजय हिंमतलाल जैन, विशाल विमल जैन, प्रविणप्रकाश दिलीप जैन | १७७ | २-४४-० |
| | | एकूण | २-४४-० |
| १५ | राजेश मुकुंद मेहता, प्रविणप्रकाश दिलीप जैन | २०८ | ०-९९-० |
| | | एकूण | ०-९९-० |
| १६ | रूक्मीणी सहादेव मळेकर | २०५ | ०-४३-० |
| | | एकूण | ०-४३-० |

वर वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे जमिन मालकांनी आमच्या अशिलांना विकण्याचे मान्य कबुल केले आहे. व आमचे अशिलांनी सदर मिळकत विकत घेण्यासाठी मिळकतीचा मालकाबरोबर करार केलेला आहे.

तरी सदर मिळकतीसंबंधी कोणत्याही व्यक्तींच्या अथवा कोणतेही संस्थेचा गहाण, दान, बक्षीस, खरेदी साठेकरार, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा, हक्क भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा कोणताही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास त्यांच्या लेखी हरकती आणि त्यांच्या हरकतीत नमुद केलेल्या हक्कांबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांसकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसाच्या मुदतीत प्रत्यक्ष येऊन अथवा रजि.पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकत न असल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहेत असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाही. हे कळावे. सही/-

**श्री. अरविंद चामले**
ॲडव्होकेट व नोटरी, भारत सरकार
ऑफिस-११, स्नेह सदन,
गडकरी पथ, पनवेल, जि.रायगड
फोन नं.-२७४५६१७८
मो.९८६९५५१७८५

# निवडक

## श्रीवर्धनमध्ये पावसाने घेतली उसंत

**श्रीवर्धन :** मागील पंधरा दिवसांपासून संपूर्ण महाराष्ट्रामध्ये मुसळधार पावसाने थैमान घातले होते. तर श्रीवर्धन परिसरात देखील जवळजवळ आठवडाभर पाऊस धो-धो कोसळत होता. पावसामुळे या ठिकाणचा पर्यटन व्यवसाय पूर्णपणे ठप्प झाला होता. तर सतत पडत असलेल्या पावसामुळे नागरिकांना घराबाहेर पडणे देखील मुश्कील झाले होते. परंतु आज सकाळपासून पावसाने उसंत घेतलेली पाहायला मिळाली व श्रीवर्धन तालुक्यात कडक ऊन देखील पडल्याचे पहायला मिळाले. मात्र, हस्त नक्षत्र सुरू असल्यामुळे कदाचित विजांच्या कडकडाटासह सायंकाळच्या वेळेस पाऊस पडेल की काय? अशी शक्यता नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. परंतु पावसामुळे ढगाळ व कोंदट वातावरणातून नागरिकांना थोडासा तरी दिलासा मिळाला आहे.

## सराफा व्यावसायिकावर दरोडा

पनवेल : पनवेल शहराजवळील करंजाडे रेल्वे फाटकाजवळ शुक्रवारी (दि.२६) रात्री सराफा व्यवसायिकावर मोठा दरोडा टाकण्यात आला. या प्रकरणी व्यवसायिकाने पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली आहे. विराज शिरकांडे यांचा आशापुरा गोल्ड बुलीयन नावाचा सोन्याचा व्यवसाय असून शुक्रवारी ते आपल्या तीन सहकाऱ्यांसह मुंबई झवेरी बाजारात सोन्याची खरेदीसाठी गेले होते. त्यांनी तेथे १० लाख रुपये रोख व प्रत्येकी १०० ग्रॅम वजनाची दोन सोन्याची बिस्किटे (२३.४० लाख रुपये) खरेदी केली. उशिरा रात्री ते आपल्या गाडीतून पनवेलकडे येत असताना करंजाडे रेल्वे फाटकाजवळ चॉकलेटी रंगाची इर्टिगा गाडी त्यांना आडवी आली. त्या गाडीतून उतरलेल्या तीन-चार जणांनी पोलिसांचा गणवेश घातला होता. त्यांनी शिरकांडे व त्यांच्या सहकाऱ्यांना गाडीतून बाहेर काढून पोलीस काठ्यांनी मारहाण केली व दमदाटी करत त्यांच्या गाडीतून १० लाखांची रोकड, दोन सोन्याची बिस्किटे, मोबाईल फोन व इतर वस्तू हिसकावून घेतल्या. त्यानंतर पीडितांना काही अंतरावर जबरदस्तीने नेऊन रस्त्यावर सोडून आरोपी पसार झाले. या घटनेत सोने, रोकड, ॲपल आयफोनसह अन्य मोबाईल फोन, घड्याळ आणि बॅगा अशी एकूण ३४ लाखांची चोरी झाली.

## ११ लाखांचे दागिने चोरीला

**पनवेल :** कामोठे सेक्टर ३५ येथील गृहनिर्माण सोसायटीमधील एका सदनिकेत ११ लाखांचे दागीने चोरी झाले आहेत. या सोसायटीमध्ये गरब्याचे आयोजन करण्यात आले असून येथील रहिवाशी घराचा दरवाजा उघडा ठेऊन गरब्यात सामिल होण्यासाठी गेल्यावर ही चोरी झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. या प्रकरणी शनिवारी (दि.२८) कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. कामोठे सेक्टर ३५ मधील गिरीराज कॉ. ऑप. सोसायटी ही अतिसुरक्षित सोसायटी म्हणून ओळखली जाते. या सोसायटीमध्ये सूरक्षा रक्षकापासून ते सीसीटिव्ही यंत्रणा सक्षम असल्याने शहरातील रहिवाशांमध्ये अनेकदा या गृहनिर्माण सोसायटीचा दाखला दिला जातो. परंतु, त्याच सोसायटीमध्ये चोरी झाली आहे. ही चोरी सोसायटीमध्ये १३ व्या मजल्यावर राहणाऱ्या विलास मस्कर यांच्या घरात झाली आहे. ही चोरी १६ ते २७ सप्टेंबर दरम्यान झाल्याची माहिती मस्कर यांच्या पत्नीने दिली आहे. चोरीत गेलेले सूमारे २२२.३५ ग्रॅम वजनाचे ११ लाख ८१ हजार ८५९ रुपयांचे दागीने असल्याचे त्यांनी सांगितले. सोसायटीमध्ये नवरात्रोत्सव साजरा केला जात असून सोसायटीची नवीन कार्यकारी मंडळाची निवडणूकीचा प्रचार काही दिवसांपूर्वी सुरू झाला आहे. या दोन्ही गोष्टींमुळे इमारतीमध्ये सदनिकाधारकांची व इतरांची वर्दळ वाढली होती. या वर्दळीमुळे सूरक्षित सोसायटीत चोर शिरला असण्याची शक्यता वर्तविली जात आहे. मस्कर कुटुंबियांच्या हालचाली टिपून ही चोरी करण्यात आल्याचा पोलिसांचा संशय आहे. त्यामुळे सोसायटीतील अनेकांकडून याबाबतची माहिती पोलीस घेत आहेत. कामोठेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विमल बिडवे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि नवी मुंबई पोलीसांची गुन्हे शाखा, गुन्हे प्रकटीकरण विभाग यांच्या मार्फतीने या चोरी प्रकरणी शोध सुरू आहे.




## बाजारपेठेतील निवारा शेड कोसळली

**मुरुड :** गेली अनेक वर्षे दुरावस्थेत असलेली मुरुडच्या बाजारपेठेतील कल्याणी हॉस्पिटल समोरील निवारा शेड आज सकाळच्या वेळेत कोसळली. यावेळेत अगोदर केळघर, अलिबाग व रोह्याकडे जाणाऱ्या एसटी.गाड्या येथून निघून गेल्याने सुदैवाने जीवितहानी टळली. नेहमी याठिकाणी काही प्रवासी बसलेले असायचे. शहरातील अलिबाग, मुंबई, पुणे तसेच आजूबाजूच्या ग्रामीण भागातील प्रवाशांसाठी असलेल्या या निवारा शेडची पार दुरावस्था झाली होती, वेळोवेळी दुरुस्तीची मागणी केली जात होती. नगरपरिषद संबंधितांनी याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले. शहरातील काही धोकादायक दायक इमारतींना संबंधितांकडून नोटीस बजावण्यात आली मात्र दुरावस्था झालेल्या या निवारा शेडकडे जाणीव पूर्वक दुर्लक्ष झाले असल्याची चर्चा नागरिकांमधून ऐकायला येत आहे. नगरपरिषदेच्या संबंधित अधिकाऱ्यांनी यात तातडीने लक्ष पुरवून याठिकाणी प्रवाशांसाठी लवकरातलवकर नवीन निवारा शेड बांधण्यात यावी. अशी मागणी प्रवासी व नागरिकांतून केली जात आहे.

## पनवेल परिसरात आढळला अनोळखी मृतदेह

**पनवेल :** पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीत एक ६० वर्षीय बेवारस अनोळखी मयत इसम आढळून आहे. सदर इसमाच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहे. सदर इसमाचे रंग सावळा, उंची साडे ५ फुट २ इंच, चेहरा उभट, अंगाने सडपातळ, डोक्याचे व दाढीचे केस काळे पांढरे व वाढलेले, कपाल मोठे, नाक सरळ असा पेहराव आहे. सदर इसमाबाबत कोणाला काही माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा पोलीस उपनिरीक्षक विनोद लभडे यांच्याशी संपर्क साधावा.

# खारफुटीत अडकले उपजिल्हा रुग्णालय

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यात खुलेआम खारफुटीच्या जंगलाची कत्तल करून व्यवसायिकांना खासगी गोदाम उभारणीसाठी शासकीय प्रशासन परवानगी देत आहे. मात्र, सिडकोच्या बोकडविरा परिसरात मंजूर झालेल्या भूखंडावरील १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय उभारण्यासाठी शासकीय प्रशासन परवानगी देत नसल्याची माहिती समोर येत असल्याने जनसामान्यांत आश्चर्य व्यक्त केले जात आहे.




गेल्या अनेक वर्षांपासून उरणकरांना सुसज्ज उपजिल्हा रुग्णालयाची प्रतीक्षा आहे. मात्र, किनारा नियमन (सीआरझेड)ची परवानगी न मिळाल्याने हे रुग्णालय रखडले आहे. त्यामुळे येथील रुग्णांना पनवेल किंवा नवी मुंबईत जाऊन उपचार घ्यावे लागत आहे. तर, दुसरीकडे तालुक्यात शासकीय किंवा खासगी अतिदक्षता विभाग असलेले रुग्णालय उपलब्ध नसल्याने रुग्णांना रस्त्यातच आपले जीव गमवावे लागत आहे. त्यामुळे उरण सामाजिक संस्थेच्या माध्यमातून येथील अपघात आणि रुग्णांचे होणारे हाल या विरोधात आंदोलन करण्यात आले होते.

२०१० मध्ये शासनाने उरणमध्ये १०० खाटांचे रुग्णालय उभारण्याला प्रशासकीय मंजुरी दिली होती. त्यासाठी सिडकोच्या बोकडविरा परिसरात भूखंड मंजूर करण्यात आला असून सुमारे ५८ कोटींचा निधी देखील मंजूर करण्यात आला होता.

मात्र, हा भूखंड सीआरझेडध्ये मोडत असल्याने शासनाच्या नाकर्तेपणामुळे आज उरणकरांच्या आरोग्याच्या दृष्टीने अतिशय महत्वपूर्ण असलेले उपजिल्हा रुग्णालय कांदळवनाच्या कचाट्यात अडकून पडले आहे, असे जनसामान्यांमधून बोलले जात आहे.

एकंदरीत खासगी व्यवसायिकांना गोदाम उभारणीसाठी शासकीय प्रशासन खुलेआम खारफुटीच्या जंगलाची कत्तल करण्यासाठी परवानगी देत आहे. मात्र, उरणकरांच्या आरोग्याच्या दृष्टीने अतिशय महत्वपूर्ण असलेल्या सेवेपैकी सुसज्ज उपजिल्हा रुग्णालय उभारण्यासाठी सिडकोच्या बोकडविरा परिसरातील मंजूर भूखंडावर सीआरझेडचे कारण पुढे करत शासकीय प्रशासन परवानगी देत नसेल तर ती शोकांतिका आहे, अशी प्रतिक्रिया जनमानसात उमटू लागली आहे.

> "उरण तालुक्यात औद्योगिकरण व नागरिकरण झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे येथील इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालय व कोप्रोलीतील प्राथमिक आरोग्य केंद्रातील रुग्णालयावर त्याचा ताण पडत आहे. त्यामुळे अत्याधुनिक सुविधा युक्त सुसज्ज उपजिल्हा रुग्णालय उभारण्यासाठी सिडकोच्या बोकडविरा परिसरात भूखंड मंजूर करण्यात आला आहे. तसेच, १०० खाटांच्या रुग्णालयासाठी सुमारे ५८ कोटीचा निधी देखील मंजूर करण्यात आला आहे. परंतु, मंजूर झालेल्या भूखंडावर खारफुटी असल्याने परवानगी अभावी या रुग्णालयाचे काम रखडले आहे.
> -डॉ. राजेंद्र इटकरे, अधिकारी, उरण तालुका आरोग्य विभाग"




## आदर्श पतसंस्थेची प्रथम क्रमांकावर झेप

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेचा गुरुवारी (दि.२) २७ वा वर्धापन दिन साजरा झाला. त्यापूर्वीच आदर्शने ९३५ कोटी रुपयांचा एकत्रीत व्यवसायाचा पल्ला गाठून जिल्ह्यात अव्वल क्रमांकावर झेप घेतली आहे. त्या निमित्त बुधवारी (दि.१) आदर्श भवन येथे कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी आदर्श पतसंस्थेचे संस्थापक सुरेश पाटील यांनी ही माहिती दिली.

एक हजार कोटी रुपयांचा एकत्रीत व्यवसाय करण्याचा संकल्प आम्ही मार्च २०२५ मध्येच केला होता. त्यामुळे वातावरण निर्मिती झाली. हे उदिष्ट गाठण्यासाठी सर्व कर्मचाऱ्यांनी जबाबदारीने काम केले. म्हणून ९३५ कोटींचा पल्ला गाठला. मार्च २०२६ पर्यंत १ हजार कोटी रुपयांचा एकत्रीत व्यवसायाचा पल्लाआम्ही नक्की गाठू असे सुरेश पाटील यांनी सांगितले. तसेच, आदर्श पतसंस्थेने ग्राहकांच्या मनात स्थान निर्माण केले आहे. त्यामुळे या पतसंस्थेने रायगड जिल्ह्यात प्रथम क्रमांकावर झेप घेतली आहे. हा प्रथम क्रमांक टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न करावे लागतील, असे सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उदय जोशी म्हणाले. यावेळी दत्ता पाटील क्रेडिट सोसायटीचे अध्यक्ष प्रमोद पाटील व वात्सल्य ट्रस्टच्या अध्यक्ष शोभा जोशी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

यावेळी आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष अभिजित पाटील, उपाध्यक्ष कैलास जगे, सतीश प्रधान, रामभाऊ गोरीवले, संजय राऊत, ॲड. वर्षा शेठ, ॲड. रेश्मा पाटील, विलाप सरतांडेल, डॉ. मकरंद आठवले, ॲड. आत्माराम काटकर, मुख्य कार्यकारी अधिकारी मीनाक्षी पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. मुख्याधिकारी उमेश पाटील यांनी आभार प्रदर्शन केले.

## प्रकाश आंबेडकरांचा आंदोलनाला पाठिंबा

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड नागोठणे कंपनीत ३२४ प्रकल्पग्रस्तांना कायमस्वरूपी नोकरी द्या, जोपर्यंत प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळत नाही तोपर्यंत लढा सुरूच राहील, असा विश्वास प्रकाश आंबेडकर यांनी प्रमाणपत्र धारक प्रकल्पग्रस्त व भूमिपुत्रांना दिला. प्रकाश आंबेडकरांनी प्रकल्पग्रस्तांच्या आंदोलनाला पाठिंबा दिल्याने आम्हाला ते शंभर टक्के न्याय मिळवून देणार, असा भरभक्कम विश्वास येथील प्रकल्पग्रस्त व भूमिपुत्र व्यक्त करत आहेत. आझाद मैदानावर ७ ऑक्टोबरला होणाऱ्या आंदोलनाला ॲड. प्रकाश आंबेडकरांचा पाठिंबा मिळाल्याने या लढ्याला बळ मिळाले आहे. भूमिपुत्र प्रकल्पग्रस्त सामाजिक संस्थेचे अध्यक्ष गंगाराम मिणमिने यांच्या समवेत पदाधिकाऱ्यांनी वंचित बहुजन आघाडीचे नेते ॲड. प्रकाश आंबेडकरांची भेट घेतली व पुढील आंदोलनाची रणनिती ठरवली.



## दिबांच्या नावासाठी सोमवारी धडक मोर्चा

**। उरण । प्रतिनिधी ।**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्यात यावे, या मागणीसाठी रोहा व पेण तालुक्यातील विविध सामाजिक संघटनांची मोर्चाची तयारी सुरु झाली आहे. नवी मुंबई विमानतळ धडक मोर्चा सोमवारी (दि.६) सकाळी १० वाजता गणपत शेठ तांडेल मैदान ते नवी मुंबई विमानतळ रेती बंदर गेट येथे काढण्यात येणार आहे. शिवराज्य प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्यचे प्रदेशाध्यक्ष ॲड. रोशन पाटील यांनी नागोठणे येथे आयोजित बैठकीत या आंदोलनाची घोषणा केली. गेल्या अनेक वर्षांपासून याकरिता संघर्ष सुरू आहे. केंद्र सरकारकडून अद्याप कोणताही सकारात्मक निर्णय झालेला नाही. त्यामुळे भूमिपुत्रांच्या भावनांचा सन्मान करण्यासाठी प्रथम नाव निश्चित करावे आणि त्यानंतरच विमानतळाचे उद्घाटन व्हावे, ही आमची ठाम मागणी असल्याचे त्यांनी सांगितले.

## जागतिक हृदय दिन साजरा

**पनवेल :** कळंबोलीतील रोडपाली येथे असलेल्या व्हाईट लोटस हॉस्पिटलमध्ये जागतिक हृदय दिन साजरा करण्यात आला. या हॉस्पिटलच्या माध्यमातून समाजातील तब्बल ५०० रुग्णांना विनामूल्य सल्ला देण्यात आला. यावेळी डॉ. अनुज साठे, डॉ. निखिल परचुरे, डॉ.नितीन गुंद्रे, डॉ. देवेंद्र देशमुख, डॉ. विजय डीसिल्वा यांनी नागरिकांची हृदयरोगाबाबत हितगुज केले. हॉस्पिटलने राबवलेल्या सामाजिक उपक्रमाबद्दल धन्यवाद दिले.

## तुराडे ग्रामपंचायतीत बालस्नेही विषयावर प्रशिक्षण



**। रायगड । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील पनवेल पंचायत समिती हददितील तुराडे ग्राम पंचायत येथील ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच, सदस्य, ग्रामसेवक आणि बाल गाव संरक्षण समिती सदस्यांना (दि. २६) सप्टेंबर रोजी - सेंटर फॉर सोशल ॲकशन मुंबईतर्फे बालस्नेही ग्रामपंचायत कशा प्रकारे करायची या विषयावर प्रशिक्षण देण्यात आले. सेंटर फॉर सोशल ॲकशन मुंबई यांचे बाल सभा मंच प्रकल्पाचे महाराष्ट्र समन्वयक दयानंद पाटील यांनी उपस्थित सदस्यांना बालस्नेही संकल्पना, बालस्नेही ग्रामपंचायत महत्व, बाल सभा आणि बाल पंचायत सक्षमीकरण, स्थानिक सामाजिक कार्यकर्ते भुमिका, बालस्नेही ग्रामपंचायत सरपंच आणि ग्रामसेवक भुमिका या विषयावर प्रशिक्षण दिले.

सदर प्रशिक्षण स्थानिक संस्था प्रेरणा संस्था रिस आणि तुराडे ग्रामपंचायतीच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले होते. प्रशिक्षणास रुचिका सेलियन, रसिका डोंगरकर, मनिष भालेराव, रेखा रोस, प्राची खेडेकर, स्वाती खरमिसे, नंदा धनवडे, संगिता ठाकुर, प्रतिक्षा चव्हाण, मनिषा देशमुख, शिल्पा देशमुख, अस्मिता कचरे, उषा कातकरी, स्वाती म्हात्रे, सारिका गायकर, ज्योत्स्ना पाटील रंजना गायकवाड, मालती वाघमारे, रिया माळी, सचिन मते, पुजा भोईर, लिना ठाकुर, अस्मिता मोकल, आरती पाठारे, वासंती सावंत, निलम ठाकुर, दिपिका ठाकुर, प्रतिमा माळी, विश्वनाथ गायकवाड आणि आनंद पवार, नजमा साखरकर, विद्या पाटील यांनी प्रशिक्षणात सहभागी होऊन तुराडे ग्रामपंचायत बालस्नेही ग्रामपंचायत करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

## होमिओपॅथिक प्रॅक्टिशनर असोसिएशनतर्फे निवेदन

**महाड :** महाड पोलादपूर होमिओपॅथिक प्रॅक्टिशनर असोसिएशनतर्फे प्रांताधिकारी तसेच तहसीलदार, महाड यांना निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनामध्ये सीसीएमपी धारक होमिओपॅथिक वैद्यकीय व्यावसायिकांची नावे महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल अधिनियम १९६५ च्या अनुसूची २८ अंतर्गत स्वतंत्र पुस्तिकेत नियमितपणे नोंदविण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.सदरहू शिष्टमंडळामध्ये महाड-बिरवाडी परिसरातील लक्षणीय संख्येने होमि ओपॅथिक वैद्यकीय व्यावसायिक सहभागी झाले होते. त्यामध्ये डॉ. राहुल सुकाळे, डॉ. नूतन सुकाळे, डॉ. चेतन सुर्वे, डॉ. सचिन बुटाला, डॉ. नितीन मिंडे, डॉ. परेश महाडीक, डॉ. स्वप्नील जाधव, डॉ. आशुतोष नावकर, डॉ. कल्पेश पावसे, डॉ. श्रीकांत पाटील आदी मान्यवर वैद्यकीय व्यावसायिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पेण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढीची सभा



**। पेण । प्रतिनिधी ।**

पेण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी लि.पेण संस्थेची १०१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (दि. २८) सप्टेंबर रोजी शेळके बंधू मंगल कार्यालय किरवली तालुका कर्जत जिल्हा रायगड येथे संस्थेचे चेअरमन मोहन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली व व्हाईस चेअरमन सुमित्रा खेडकर व मानद सचिव विनोद जोशी व सर्व संचालक मंडळ व संस्थेचे सभासद यांच्या उपस्थितीत मोठया उत्साहात संपन्न झाली. चेअरमन यांनी उपस्थित सर्व सभासदांचे स्वागत करुन सभेची सुरुवात श्रीगणेशाच्या पूजनाने तसेच थोर महापुरूषांच्या प्रतिमांचे पूजन करुन ईशस्तवन, स्वागतगीत, राज्यगीत घेवून सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

संस्थेचे सचिव नितिन वर्तक यांनी सन २०२४/२०२५ सालात मयत झालेल्या थोर व्यक्तीचे संस्थेच्या सभासदांचे व इतर व्यक्तीचे दुखवटा वाचन करुन त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. सभेसाठी आलेले मनोहर थोरवे माजी उपसभापती कर्जत तसेच जिल्हयातील सर्व शिक्षक संघटनांचे अध्यक्ष तालुक्यातील अध्यक्ष रायगड जिल्हा परिषद पुरस्कार प्राप्त शिक्षकांचे सभासदांचे चेअरमन व संस्थेच्या व्हाईस चेअरमन व संस्थेच्या संचालकांकडून सन्मान करण्यात आले.

नंतर विषय पत्रिकेप्रमाणे सभा कामकाजास सुरुवात करण्यात आली. प्रथमत मागील दिनांक ०४.०८.२०२४ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचन करण्यात आले. त्यावर सर्वांनुमते चर्चा करुन मागील इतिवृत्त सर्वांनुमते मंजूर करण्यात आले. नंतर सर्व विषयावर सभागृहात सविस्तर चर्चा करुन सर्व विषय सर्वानुमते मंजूर करण्यात आले. तसेचे सभासदांना लांभाश ९.५० दराने देण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले सभेत विचारलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे सभेचे अध्यक्ष मोहन पाटील विद्यमान संचालक सोपान चांदे व मानद सचिव विनोद जोशी व सर्व संचालक मंडळाने दिली वार्षिक सभा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाल्यामुळे चेअरमन यांच्या उपस्थित संस्थेच्या व्हाईस चेअरमन यांनी आभार मानले व त्यानंतर राष्ट्रगौरवगीता नंतर सभेची सांगता झाली.

### शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान ; उत्पादन तब्बल ३० ते ४० टक्क्यांनी घटले

# पावसाचा झेंडूच्या फुलांना फटका

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

दोन दिवस झालेल्या मुसळधार पावसामुळे झेंडू उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. सणासुदीच्या दिवसांत मोठा नफा मिळेल, या आशेने केलेली गुंतवणूक पावसाने धुऊन अक्षरश: धुऊन काढली आहे. त्यामुळे ऐन दसरा सणाला मोठी मागणी असूनही शेतकऱ्यांच्या पदरी मात्र निराशाच आली आहे.

राज्यात यंदा झेंडूचे उत्पादन मुबलक प्रमाणात झाल्याने सणासुदीच्या काळात झेंडूला चांगला दर मिळेल अशी आशा शेतकऱ्यांना होती. परंतु, गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांची घोर निराशा झाली आहे. नाशिक, पुणे, सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यांतील झेंडू पीके पावसामुळे मोठ्या प्रमाणावर सडली आहेत. अनेक शेतकऱ्यांच्या शेतात फुलं गळून पडली आहेत, तर काही ठिकाणी झाडेच वाहून गेल्याचे चित्र आहे. त्यामुळे उत्पादन तब्बल ३० ते ४० टक्क्यांनी घटल्याचे सांगण्यात येत आहे.

नवरात्री व दसऱ्याच्या काळात झेंडूला धार्मिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या मोठे महत्त्व आहे. त्यामुळे सणांपूर्वी झेंडूची विक्री मोठ्या प्रमाणावर होते.



मात्र, आता शेतकऱ्याच्या हातातोंडाशी आलेला घास पावसाच्या पाण्यात वाहून गेल्याने शेतकऱ्यांना शेतकरी हवालदिल झाले आहेत.

दरवर्षी सणासुदीच्या काळात झेंडूच्या क्रेटला ४५० ते ५०० रुपये इतका दर मिळत असतो. यंदा मात्र पावसामुळे झालेल्या हानीमुळे शेतात उगवलेल्या फुलांच्या दर्जावर मोठा विपरीत परिणाम झाला आहे. अनेक भागांत निम्म्याहून अधिक फुलांची नासाडी झाली असून, उर्वरित फुलांचा दर्जा घसरल्याचे शेतकरी सांगत आहेत.

परिणामी, झेंडूच्या त्याच क्रेटला घाऊक बाजारात फक्त २०० ते ३५० रुपये दर मिळत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना मजुरी व वाहतूक खर्च भागवणेही कठीण झाले आहे. यातच सणासुदीच्या काळात नगदी पीक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या झेंडूची शेती पाण्यात वाहूनगेल्याने शेतकऱ्यांच्या अडचणीत अधिकच भर पडली आहे.

**शहरी भागात झेंडूचे दर गगनाला**

झेंडू फुलांचे नुकसान झाल्याने ग्रामीण भागात जरी सध्या दर घसरले असले, तरी शहरी बाजारपेठेत चांगल्या प्रतीचा झेंडू कमी प्रमाणात उपलब्ध असल्याने झेंडूचे दर गगनाला भिडले आहेत.

नवरात्री आणि दसऱ्याच्या पार्श्वभूमीवर ग्राहकांकडून मागणी वाढली आहे. त्या तुलनेत झेंडूच्या फुलांचा पुरवठा मर्यादित आहे. महिन्याभरापूर्वी ४० रुपये पाव किलोने विकला जाणारा झेंडू सध्या १२०-१६० रुपये पाव किलोने विकला जात आहे. तसेच पुढील काही दिवसांत दर झपाट्याने वाढण्याची शक्यता व्यापारी आणि विक्रेत्यांकडून व्यक्त केली जात आहे.

### घाऊक बाजारातील फुलांचे दर

झेंडू : 40 रुपये किलो,
आता 120 -160 रुपये किलो

मोगरा : 160 रुपये किलो,
आताल 240 - 300 रुपये किलो

शेवंती : 80 रुपये किलो,
आता 150 रुपये किलो

चाफा : 400 रुपये किलो,
आता 600-800 रुपये किलो

कमळ : 40 रुपये 1 नग ,
आता 80 रुपये 1 नग

गुलाब : 10 रुपये 1 नग,
आता 20 रुपये 1 नग

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)